बुधवार, २९ सप्टेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ७२
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

अपघात रोखण्यासाठी उपाययोजनेची मागणी/३
पालीत माकडे आणि वानरांचा उच्छाद; नागरिक हैराण/५
अलिबागमध्ये जिल्हास्तरीय खुली बुद्धिबळ स्पर्धा/६

## एमपीएससी परीक्षेत साताऱ्याचा प्रसाद चौगुले प्रथम



**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) मुख्य परीक्षेचा निकाल मंगळवारी (दि. २८) जाहीर झाला. साताऱ्याच्या प्रसाद चौगुले याने या परीक्षेत राज्यात पहिला क्रमांक पटकावला असून मानसी पाटील हिने मुलींमध्ये पहिला क्रमांक पटकावला आहे. १३ जुलै ते १५ जुलै २०१९ या कालावधीमध्ये राज्य लोकसेवा आयोगातून जी परीक्षा घेण्यात आली होती. त्याचा हा अंतिम निकाल आहे. एकूण ४२० पदांसाठी ही परीक्षा घेण्यात आली होती, ज्यामध्ये उपजिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, पोलीस उपअधीक्षक अशा वेगवेगळ्या २६ पदांचा समावेश होता. या परीक्षेचा अंतिम निकाल जवळपास दोन वर्षांनी लागला आहे. या परीक्षेत रोहन कुंवर हा मागासवर्गीयांमध्ये पहिला आला आहे.

# अतिवृष्टीने दाणादाण

## राज्यात आणखी एका चक्रीवादळाची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले गुलाब चक्रीवादळ निवळले असून, त्याचे कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतर झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या विविध भागांत पाऊस पडत असून मराठवाड्यात पुरामुळे हाहाकार उडाला आहे. राज्यात पुढील ४८ तासांत गुलाब चक्रीवादळाच्या राहिलेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा प्रभाव दिसणार आहे तसेच येत्या २४ तासांत कोकण, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

गुलाब चक्रीवादळ रविवारी आंध्र प्रदेश आणि ओडिशाच्या किनारपट्टीवर धडकले होते. त्यानंतर चक्रीवादळाची तीव्रता कमी झाली, मात्र या काळात किनारपट्टीच्या भागाला त्याने तडाखा दिला. सोमवारी चक्रीवादळ निवळले आणि त्याचे रूपांतर आता तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रात झाले आहे. हे क्षेत्र सध्या छत्तीसगड आणि ओडिशाच्या दक्षिणेला आहे. त्यानंतर ३० सप्टेंबरला ते अरबी समुद्रात प्रवेश करणार असून अरबी समुद्रात त्याची तीव्रता पुन्हा वाढून नवे चक्रीवादळ तयार होण्याचा अंदाज आहे. त्याचे नाव शाहीन असणार आहे.

राज्यात पुढील २४ तासांत गुलाब चक्रिवादळाच्या प्रभावामुळे मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, कोकणात मुसळधार ते अतिमुसळधार व अतिवृष्टीची शक्यता आहे. याचा प्रभाव मुंबई, ठाणे व विदर्भात प्रभाव कमी, पण बुधवारी कोकण व उत्तर व मध्य महाराष्ट्रात राहिल, अशी माहिती हवामान विभागाने दिली.

### पिकांचे नुकसान, बळीराजा हवालदिल

राज्यात सर्वदूर पाऊस पडत आहे. सततच्या पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून बळीराजा चिंतातुर झाला आहे. एकट्या मराठवाड्यात ३५ जणांचा मृत्यू झाला असून चार ते पाच हजार जनावरे वाहून गेली आहेत, तर २० लाख हेक्टरवरील शेतीचे नुकसान झाले आहे.

## बुडित कर्नाळा बँकेमध्ये ठेवी ठेवणाऱ्या उरणमधील १० ग्रामपंचायतींचे धाबे दणाणले

### शासकीय चौकशीमुळे संबंधित सरपंच, ग्रामसेवक अडचणीत

**उरण : प्रतिनिधी**


परवाना रद्द झालेल्या कर्नाळा बँकेत आपल्या ग्रामपंचायतींनी ठेवलेल्या ठेवी परत मिळविण्यासाठी कोणती उपाययोजना केली याचा अहवाल सादर करावा, असे लेखी आदेश उरण पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी नीलम गाडे यांनी उरण तालुक्यातील १० ग्रामपंचायतींना दिले आहेत. त्यामुळे कर्नाळा बँकेत कोट्यवधींच्या ठेवी ठेवणाऱ्या या ग्रामपंचायतींच्या सरपंचांचे आणि ग्रामसेवकांचे धाबे दणाणले आहेत.

उरण तालुक्यातील चाणजे, धुतूम, चिर्ले, पागोटे, बोकडविरा, भेंडखळ, जासई बांधपाडा, पिरकोन व विंधणे या १० ग्रामपंचायतींनी नियम धाब्यावर बसवून कर्नाळा बँकेत ग्रामपंचायतींच्या नावाने परस्पर खाती उघडली आणि त्यात कोट्यवधी रुपयांच्या ठेवी ठेवल्या आहेत. कर्नाळा नागरी सहकारी बँकेत जिल्ह्यातील ग्रुप ग्रामपंचायतींनी परस्पर मोठ-मोठ्या रकमा ठेवींच्या स्वरूपात ठेवल्या आहेत. कर्नाळा बँकेचा परवाना रद्द झाल्याने त्यातील ठेवी परत मिळविण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींनी आजतागायत काय उपाययोजना केल्या आहेत याची माहिती भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव यांनी रायगड जिल्हा परिषदेकडे मागितली आहे.

या पत्राची दखल रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी घेतली. त्यांनी उरणच्या गटविकास अधिकारी नीलम गाडे यांना याबाबत माहिती घेण्याचे आदेश दिले. गाडे यांनी उरण तालुक्यातील कर्नाळा बँकेत ठेवी असलेल्या संबंधित १० ग्रामपंचायतींनी काय उपाययोजना केली, याचा लेखी अहवाल दोन दिवसांत देण्याचे आदेश दिल्याने संबंधित सरपंच व ग्रामसेवकांचे धाबे दणाणले आहेत. या ग्रामपंचायतींकडून आता काय अहवाल येतो याकडे उरण, पनवेलसह रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## खोपोलीत तीन जण वाहून गेले

### दोघांचे मृतदेह सापडले, मुलीचा शोध सुरू




**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

वर्षा पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी झेनिथ धबधब्यावर गेलेल्या खोपोलीतील तीन पर्यटकांचा पाताळगंगा नदीच्या प्रवाहात वाहून गेल्याची घटना मंगळवारी (दि. २८) सायंकाळी घडली. यापैकी दोघांचे मृतदेह सापडले असून एका मुलीचा शोध सुरू आहे.

खोपोलीतील सुप्रसिद्ध झेनिथ धबधबा परिसरात ढगफुटीसदृश परिस्थिती निर्माण होऊन शहरातून वाहणाऱ्या पाताळगंगा नदीला पूर आला होता. (पान २ वर..)

## यवतमाळमध्ये पुराच्या पाण्यात एसटी गेली वाहून; तिघांचा मृत्यू

**यवतमाळ : प्रतिनिधी**




यवतमाळमधील उमरखेड येथील दहागावजवळ पुराच्या पाण्यात एसटी बस वाहून गेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या बसमध्ये सहा प्रवासी होते. यातील तीन जणांचा मृत्यू झाला आहे. दोन प्रवाशांना वाचवण्यात स्थानिकांना यश आले, तर एकाच्या बचावासाठी प्रयत्न सुरू होते.

मुसळधार पावसामुळे दहागाव येथील नाल्याच्या पुलावरून पाणी वाहत होते. याच नाल्यावरून एसटीचालकाने बस नेल्याने ती पुराच्या पाण्यात वाहून गेली. उमरखेडवरून ही एसटी बस पुसद येथे जात असताना मंगळवारी (दि. २८) सकाळी साडेआठच्या सुमारास ही घटना घडली. घटनेनंतर तहसीलदार आणि बचावपथक घटनास्थळी दाखल झाले.

## शेकाप कार्यकर्त्यांच्या गमजा विरल्या!

### माजी आमदार विवेक पाटील ११ ऑक्टोबरपर्यंत जेलमध्येच



**पनवेल :** विवेक पाटील यांचा पुन्हा एकदा जामीन फेटाळून न्यायालयाने त्यांना ११ ऑक्टोबरपर्यंत जेलमध्ये ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता आमचे साहेब तुरुंगातून सुटणारच, अशा गमजा मारणारा मेसेज सोशल मीडियावर वरचेवर पाठवणाऱ्या शेकाप कार्यकर्त्यांच्या बाता हवेत विरून गेल्या आहेत. (पान २ वर..)

## निवडक

### पंजाब काँग्रेसमध्ये पुन्हा भूकंप; सिद्धूंचा राजीनामा

**चंदिगड :** पंजाबमधील राजकीय नाट्यमय घडामोडी थांबत नसल्याचे दिसत आहे. मुख्यमंत्री अमरिंदर सिंग यांनी काही दिवसांपूर्वीच राजीनामा सोपवलेला असताना, आता पंजाब काँग्रेसमध्ये पुन्हा एकदा राजकीय भूकंप झाला आहे. पंजाब काँग्रेसचे प्रमुख नवज्योतसिंग सिद्धू यांनी राजीनामा दिला आहे.

### ग्लेशियरजवळ १४ गिर्यारोहक अडकले, दोन जणांचा मृत्यू

**शिमला :** हिमाचल प्रदेशच्या लाहौल स्पीतिमध्ये ट्रेकिंगसाठी गेलेला १६ जणांचा एक गट खंमीगर ग्लेशियरजवळ अडकून पडला आहे. सतत होणारी बर्फवृष्टी आणि थंडीमुळे येथे अडकलेल्या गिर्यारोहकांपैकी दोघांचा मृत्यू झाला आहे, तर अडकलेल्या इतर १४ जणांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी बचावकार्य सुरू करण्यात आले आहे.

### ताजुद्दीन शेख महाराजांचा कीर्तनादरम्यान मृत्यू

**धुळे :** प्रख्यात कीर्तनकार ह.भ.प. ताजुद्दीन शेख महाराज यांनी धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात जामदे गावी कीर्तन सुरू असतानाच अखेरचा श्वास घेतला. गावातील राम मंदिरात सुरू असलेल्या सप्ताहामध्ये कीर्तन करत असताना महाराजांना हृदयविकाराचा झटका आला. भाविकांनी त्यांना तत्काळ रुग्णालयात नेले, मात्र त्यांची प्राणज्योत मालवल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

## भ्रष्टाचाराच्या राक्षसाचा वध करण्यासाठी मला शक्ती दे!

### भाजप नेते किरीट सोमय्या यांची अंबामातेकडे प्रार्थना



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी मंगळवारी (दि. २८) कोल्हापूर दौऱ्यात महालक्ष्मी मंदिराच्या बाहेरून अंबाबाईचे दर्शन घेतले. त्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी राज्यातील महाविकास आघाडी सरकारवर टीका केली आहे. सोमय्या म्हणाले, अंबामातेकडे मी प्रार्थना केली आहे की, मातेने त्या वेळी राक्षसाचा वध केला होता. आता महाराष्ट्राला भ्रष्टाचाररूपी एक शाप मिळालाय, भ्रष्टाचाराचा राक्षस तयार झाला आहे, त्याचा वध करण्यासाठी मला शक्ती दे.

दरम्यान, अनिल परब ईडीसमोर चौकशीसाठी हजर झाल्याबद्दल विचारणा केली असता त्यावर त्यांनी खोचक प्रतिक्रिया दिली. अनिल परबांची गोड बातमी म्हटले तर योग्य दिसणार नाही, पण भावना गवळीचा पार्टनर सईद खान, ज्याने मला जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता त्या सईद खानला आज अटक केली आणि तो जेलमध्ये गेला, असे सोमय्या यांनी सांगितले.

सोमय्या पुढे म्हणाले, घोटाळे उघड करणे आपले काम आहे. आमचे हसन मुश्रीफ हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. आनंद अडसूळांना अटक करण्यासाठी गेले असता तेही हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. काही लोक गायब होतात. माझे काम आहे की ज्यांनी राज्याच्या जनतेला लुटले आहे तो घोटाळा उघड करणे आणि त्याचा पाठपुरावा करणे.

### हसन मुश्रीफांविरोधात पोलिसांत तक्रार दाखल

कोल्हापूर दौऱ्यावर असलेले भाजप नेते किरीट सोमय्या यांनी मुरगूड पोलीस ठाण्यात जाऊन राज्याचे ग्रामविकास मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हसन मुश्रीफ यांच्या विरोधात तक्रार नोंदवली. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेत याबाबत माहिती दिली. हसन मुश्रीफ आणि त्यांच्या जावयाने १५०० कोटींचा घोटाळा केला आहे. ही कलापण वेगळीच आहे. मुश्रीफांनी स्वतःच्या ग्रामविकास खात्याच्या कामाचे टेंडर जावयाच्या कंपनीला दिले. ज्या कंपन्या अस्तित्वात नाहीत त्या कंपन्यांमधून पैसे आले. ग्रामविकास खात्याने सगळ्या ग्रामपंचायतींसाठी निविदा काढल्या, असा आरोप सोमय्या यांनी या वेळी केला.

### मंत्री आणि शिवसेना नेते अनिल परब यांची चौकशी

**मुंबई :** राज्याचे परिवहनमंत्री आणि शिवसेना नेते अनिल परब यांना आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी दोनदा समन्स बजावण्यात आल्यानंतर अखेर ते मंगळवारी (दि. २८) ईडीसमोर चौकशीसाठी हजर झाले. ईडीकडून त्यांची जवळपास आठ तास चौकशी करण्यात आली.

## पनवेलमध्ये गर्भाशय कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि कॅन्सर पेशंट्स ऐड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरवर प्रतिबंधात्मक लसीकरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम २ ऑक्टोबर रोजी सीकेटी महाविद्यालयात होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि. २८) भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक झाली.



या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

या लसीकरण कार्यक्रमाचे उद्‌घाटन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. (पान २ वर..)

### गौरा गणेशोत्सवानिमित्त क्रिकेटचा देखावा



उरण : गौरा गणेशोत्सवानिमित्त चिरनेर येथील श्री गावदेवी सार्वजनिक गणेश मंडळ आणि महिला मंडळाने प्रकाशझोतातील क्रिकेट स्पर्धेचा देखावा उभारला आहे. तो पाहण्यासाठी क्रिकेटप्रेमींची गर्दी होत आहे.

वजन कमी करा..
पोट, ढेरी, जाडी कमी करा
आयुर्वेदिक औषध
३ महिन्याचे फक्त १२०० रुपये
महिन्यात वजन कमी करा!
नो साईड इफेक्ट. आजच ऑर्डर करा!!



संपर्क - ७८४१०८६८६६
प्रोप्रायटर : साई आयुर्वेदा मार्केटींग सर्व्हिस



# दुटप्पी ठाकरे सरकारकडून सूडबुद्धीने शेतकऱ्यांची वीजतोडणी

## वसुली कारवाईवर भाजपचे टीकास्त्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वीज बिल थकबाकी वसुलीसाठी आता महावसुली सरकारने राज्यातील गरीब व मध्यमवर्गीयांच्या खिशावर डल्ला मारण्यास सुरुवात केली असून गरीब वीज ग्राहकांच्या घरात अंधार पसरविण्याचे कारस्थान आखले आहे. धनाढ्य वीज ग्राहकांच्या आणि सरकारी कार्यालयांच्या कोट्यवधी रुपयांच्या थकबाकीकडे दुर्लक्ष करून गरीब कुटुंबांची वीज कापणाऱ्या ठाकरे सरकारने आपला



जनताविरोधी चेहरा पुन्हा उघड केला आहे, अशी टीका भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.

राज्यातील सरकारी कार्यालये, ग्रामपंचायती, पाणीपुरवठा योजना, मंत्र्यांचे बंगले, साखर कारखाने, खाजगी फार्म हाऊसमधील वीज बिलांच्या थकबाकीने उच्चांक गाठला असताना त्याकडे दुर्लक्ष करून दुष्काळ, अतिवृष्टी, कोरोना काळातील टाळेबंदीमुळे अगोदरच कंबरडे मोडलेल्या शेतकरी व गरीब कुटुंबांची ठाकरे सरकारने फसवणूक केली आहे. धनिक थकबाकीदारांसाठी अभय योजना राबविणाऱ्या आघाडी सरकारने गरीब शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले, असा आरोपही त्यांनी केला आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, वादळांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे, तर कोरोना काळातील टाळेबंदीमुळे सामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. या संदर्भात विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी मार्च महिन्यात विधिमंडळाच्या अधिवेशनात सरकारला जाब विचारल्यानंतर कृषी पंप आणि घरगुती ग्राहकांच्या वीज तोडणीची कारवाई थांबविण्याचे आश्वासन देण्यात आले, पण अधिवेशनानंतर पुन्हा वीजतोडणीची कारवाई सुरू करून सरकारने सामान्य जनतेचा विश्वासघात केला.

फडणवीस सरकारच्या काळात वीजग्राहकांच्या समस्या लक्षात घेऊन थकबाकी वसुली थांबविली गेली व वीज मंडळास आर्थिक साह्यदेखील केले. तरीही संपूर्ण कर्जमाफी मिळेपर्यंत वीजबिल भरू नका, असा सल्ला देत शरद पवारांसारखे नेते त्या काळात जनतेस भडकावत होते. आता त्यांच्याच आशीर्वादाने ठाकरे सरकारने वसुलीसाठी कारवाई करून लाखो कुटुंबांना वेठीस धरले आहे, अशी टीका आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. एकीकडे शेतकऱ्यांच्या प्रश्नावरील आंदोलनांना पाठिंबा द्यायचा व दुसरीकडे राज्यातील शेतकऱ्यांची वीज तोडायची हा महावसुली सरकारचा दुटप्पीपणा जनतेने आता ओळखला असून तो त्वरित थांबविला नाही, तर जनतेच्या रोषास सामोरे जाण्याची तयारी ठेवा, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## मुंबै बँकेच्या बदनामीविरोधात एक हजार कोटींचा अब्रुनुकसानीचा दावा दाखल –प्रवीण दरेकर

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबै जिल्हा मध्यवर्ती बँक ही राज्यातील प्रगत आणि उत्तम बँक आहे. कारण मुंबै बँक आम्ही १२०० कोटींच्या टप्प्यावरून १० हजार कोटींवर मेहनतीने आणली. मुंबईच्या सहकाराचे हे वैभव आहे. या लौकिकास काळीमा फासण्याचे काम दुर्दैवाने काही जणांकडून झाले आहे. त्यामुळे बँकेच्या संदर्भात कोणीही उठसूट वाटेल ते स्टेटमेंट देईल, हे अयोग्य असल्यामुळे बँकेने कालच मुंबई उच्च न्यायालयात एक हजार कोटींचा अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला आहे, अशी माहिती विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते व मुंबै जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष प्रविण दरेकर यांनी आज दिली.

प्रसिद्धीमाध्यमांशी बोलताना दरेकर यांनी सांगितले की, मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेला इथपर्यंत आणण्यात अनेक माजी अध्यक्ष, संचालक



आदींचे योगदान आहे. मुंबईच्या सहकाराचे हे वैभव आहे. पण बँकेला काळिमा फासण्याचे काम सर्व टप्प्यावर होत आहे. आमची राजकीय बदनामी करा, वैयक्तिक बदनामी करा परंतु एका आर्थिक संस्थेची बदनामी झाल्याचा परिणाम त्यांचे ग्राहक, डिपॉझिटर्स यांच्यावर होतो. या बँकेवर हजारो लोकांचे पोट अवलंबून असते.

एखाद्या बातमीने किंवा एखाद्या स्टेटमेंटने बँक अडचणीत आली, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? म्हणून आम्ही मुंबई बँकेच्या बदनामी करणाऱ्यांच्या विरोधात उच्च न्यायालयात सूट नंबर २१९०९ आणि सूट नंबर २१९३५ या नोंदणी क्रमांकप्रमाणे दावा दाखल केला आहे. बँकेची नाहक बदनामी करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी आम्ही न्यायालयात केल्याची माहिती दरेकर यांनी यावेळी दिली. आम्ही सव्वा रुपया वगैरेचा नाही तर एक हजार कोटीचा दावा दाखल केला आहे, असा टोलाही दरेकर यांनी या वेळी लगावला.

## क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनतर्फे मंगळागौर रंगली

**पनवेल : वार्ताहर**

महिलांच्या विकासासाठी व न्याय्य हक्कांसाठी अग्रेसर असणारी संस्था म्हणून क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशन परिचित आहे. नुकतीच क्रांतिज्योती महिला विकास फाउंडेशनतर्फे मंगळागौर कार्यक्रम पार पडला, तसेच या वेळी घेण्यात आलेल्या खेळात एकूण सहा ग्रुपने सहभाग घेतला होता.

यामध्ये रणरागिणी ग्रुप, श्रावणी ग्रुप, फुलोरा ग्रुप, गावदेवी ग्रुप, सखी ग्रुप, मैत्री ग्रुप यांचा समावेश होता. या वेळी प्रथम क्रमांक सखी ग्रुप (पनवेल) यांनी पटकावून मनाच्या पैठणीचा मान मिळविला, तर द्वितीय क्रमांक मैत्री ग्रुप (कामोठे), तसेच तृतीय क्रमांक श्रावणी ग्रुप (पनवेल) यांनी पटकविला.

प्रमुख उपस्थिती म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेविका नीता माळी, युवा नेत्या अदिती सोनार चवाते, लेखिका चित्रा देशमुख, रिमा रावल, संचिता राणे, अमिता चौहान, रूपा सिन्हा, मंदा जंगले, संगीता राऊत आदी उपस्थित होते. परीक्षक म्हणून डॉ. वनिता गडदे होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण मोहकर यांनी केले, तर क्रांतिज्योत फाउंडेशनतर्फे अध्यक्ष रुपाली शिंदे, उपाध्यक्ष नंदिनी गुप्ता, खजिनदार किरण अडागळे, मौसमी तटकरे, रत्नमाला पाबरेकर, रोशना घुमटकर, मिताली शिंदे, लावण्या, प्रिया व सभासद सदस्यांनी आलेल्या पाहुण्यांचे व सर्व ग्रुपचे आभार मानले.



## पनवेल मनपा कार्यक्षेत्रात ४४ हजार पोलिओ लसीकरण

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात रविवार (दि. २६) रोजी ० ते ५ वयोगटातील बालकांसाठी उपराष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे राबविण्यात आली. या वेळी ४४ हजारांहून अधिक बालकांना पल्स पोलिओचे लसीकरण करण्यात आले.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १ येथे उपायुक्त विठ्ठल डाके यांच्या हस्ते पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचे उद्घाटन झाले. या मोहिमेंतर्गत बालकांना विविध ठिकाणी लसीकरण करण्यात आले. महापालिका कार्यक्षेत्रात रेल्वे व बसस्थानक, सहा नागरी आरोग्य केंद्र तसेच शहरात ठिकठिकाणी पोलिओ लसीकरण केंद्र उभारले गेले होते. पनवेल कार्यक्षेत्रात एकूण ३२६ पोलिओ लसीकरण केंद्रावरती ४४ हजारांहून अधिक बालकांचे लसीकरण करण्यात आले. याबरोबरच झोपडपट्टी, बांधकाम क्षेत्र, सोसायट्या अशा ठिकाणी बालकांच्या लसीकरणासाठी ४१ मोबाईल टीम, २४ ट्रान्झिट टीमच्या सहाय्याने लसीकरण करण्यात आले.

आयपीपीआय अंतर्गत ज्या बालकांचे पल्स पोलिओ लसीकरण राहिले आहे अशा बालकांना घरोघरी जाऊन लसीकरण केले जात आहे. पुढील पाच दिवस (१ ऑक्टोबर पर्यंत) ज्या बालकांचे काही कारणाने लसीकरण राहिले आहे त्यांनी घरोघरी येणाऱ्या आशा सेविकांशी संपर्क साधून आपल्या बालकाचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

## व्यापक वाहतूक योजना

### महापालिकेचे सर्वेक्षण सुरू

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल शहर गेल्या काही वर्षांपासून प्रचंड वेगाने वाढत आहे. त्याचप्रमाणे वाढती लोकसंख्या आणि वाढती वाहने यामुळे वाहन कोंडी, पार्किंग, प्रदूषण, अपघात, पादचाऱ्यांना चालण्यास अपुरी पडणारी जागा असे प्रश्न निर्माण होत आहेत. शहराची व्यापक वाहतूक योजना तयार करण्याच्या दृष्टीने महापालिका हद्दीत सर्वेक्षण सुरू झाले आहे.

शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये सुधारणा व्हावी या दृष्टीने शहरातील विविध ठिकाणांच्या वाहतूक व्यवस्थेचा अभ्यास करून विकास आराखडा, वाहतुकीशी संबधित प्राथमिक दस्तऐवज वापरून सर्वेक्षणाला सुरुवात केली गेली आहे. या सर्वेक्षणात घरोघरी जाऊन, तसेच रेल्वे, बस स्टँण्डसारखी प्रवासाची सुरुवातीची आणि शेवटची ठिकाणे, प्रवासी नागरिकांच्या गर्दीच्या, येण्या-जाण्याच्या वेळा, कमी गर्दीच्या वेळा अशा सगळ्यांचा अभ्यास केला जात आहे तसेच नागरिकांच्या ठराविक ठिकाणी जाण्याच्या-येण्याच्या वेळा, त्यांचा प्रवास करण्यामागचा हेतू, प्रवासाचे माध्यम, त्यासाठी लागणारी किंमत, वेळ अशा सर्व गोष्टींचा समावेश सर्वेक्षणात आहे.

याचबरोबर अपघातप्रवण क्षेत्र, वाहतूक विभाग, रेल्वे विभाग, एनएमएमटी, एमएमआरडीए, एमएसआरडीसी यांच्याकडील प्रवासी नागरिकांची माहिती एकत्रित करून यांचा अभ्यासही या सर्वेक्षणांतर्गत केला जाणार आहे. या सर्वेक्षणाअंती पादचाऱ्यांसाठी, सायकलिंग करण्यासाठी, सार्वजनिक वाहतूक करणाऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचना तयार करण्यात येणार आहेत, तसेच याच माध्यमातून पार्किंगचे महसुली धोरण बनविण्यात येणार आहे. या सर्वेक्षणास नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

## पनवेल महापालिकेतर्फे छायाचित्रण स्पर्धा

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त 'रंग पनवेलचे' या संकल्पनेंतर्गत मुंबईचे महाद्वार पनवेल, बदलतं पनेवल माझं पनवेल, मायानगरीचे महाद्वार आमचं पनेवल या विषयांवर हौशी, व्यावसायिक व पालिका कर्मचारी छायाचित्रकारांसाठी महापालिकेने छायाचित्रण स्पर्धा आयोजित केली आहे.

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील हौशी व व्यवसायिक छायाचित्रकारांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन महापौर डॉ. कविता चौतमोल आणि आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे. या स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी ८९२८९३१०३२ या व्हॉटसअॅप क्रमांकावर आपली नावे नोंदवून ०५ ऑक्टोबरपर्यंत छायाचित्रे पनवेल महानगरपालिकेच्या जनसंपर्क विभागामध्ये जमा करावीत.

या स्पर्धेसाठी नियम व अटी लागू असतील, तसेच अधिक माहितीसाठी पालिकेच्या संबंधित विभागाशी संपर्क साधावा. प्रत्येक गटातील पाच विजेते घोषित करण्यात येणार आहेत. या स्पर्धेतील विजेत्यांना प्रत्येकी रुपये पाच हजारांचे बक्षीस देण्यात येणार आहे.

पान १ वरून

### खोपोलीत तीन जण वाहून गेले

अशातच खोपोली शहरातील १५ पर्यटक धबधब्याचा आनंद घेण्यासाठी गेले होते. तुफान पर्जन्यवृष्टीमुळे ते परतीच्या मार्गावर असताना पाण्याची पातळी वाढल्याने तीन जण वाहून गेले. मेहरबानू खान (वय ४०) रुबिना वेळेकर (४०) आलमा खान (८) अशी बुडालेल्यांची नावे आहेत. यापैकी दोन महिलांचे मृतदेह सापडले असून, अलमा खान या मुलीचा शोध उशिरापर्यंत सुरू होता.

### शेकाप कार्यकर्त्यांच्या गमजा विरल्या!

विवेक पाटील यांच्या न्यायालयीन कोठडीची मुदत मंगळवारी (दि. २८) रोजी संपत होती. त्यांना तळोजा जेलमधून व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) न्यायालयासमोर पुन्हा उपस्थित केले. ईडीचे असिस्टंट डायरेक्टर सुनीलकुमार यांनी विवेक पाटील यांच्या न्यायालयीन कोठडीत वाढ करावी, अशी मागणी केली. न्यायालयाने ती मागणी मान्य करून विवेक पाटील यांना ११ ऑक्टोबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

कर्नाळा बँकेतील साडेपाचशे कोटी रुपयांच्या घोटाळ्यात गुंतलेले शेकाप नेते आणि माजी आमदार विवेक पाटील हे येत्या २८ सप्टेंबरला जेलमधून सुटतील. अशी भाबडी अपेक्षा शेकाप कार्यकर्ते सोशल मीडियावर अतिउत्साहात व्यक्त करीत होते, मात्र न्यायालयाच्या निर्णयाने त्यांच्या भ्रमाचा भोपळा पुन्हा एकदा फुटला आहे.

फसवणुकीच्या गुन्ह्यात अटक झालेल्या विवेक पाटील यांच्यासह या गुन्ह्यात सहभागी असलेल्या इतर सर्वांना कधी अटक होणार आणि आमचे पैसे कधी परत मिळणार या आशेवर कर्नाळा बँकेचे खातेदार आणि ठेवीदार वाट पाहात आहेत. आतापर्यंत कोणत्याही खातेदारांना आणि ठेवीदारांना त्यांच्या बुडालेल्या पैशांपैकी एकही पैसा परत मिळालेला नाही.

विवेक पाटील यांची आता सुटका होणार, असा समज करून मनात मांडे खाणाऱ्या शेकाप नेते आणि कार्यकर्त्यांना मात्र आता पुन्हा एकदा निराशेला सामोरे जावे लागले आहे. विवेक पाटील यांनी घोटाळा केल्याने आता कर्नाळा बँकेच्या खातेदारांना पैसे कसे परत करणार हे स्पष्ट करणारी कोणतीही स्वतःची योजना विवेक पाटील, त्यांचे या घोटाळ्यातील सहकारी आणि जनतेची मते मागणाऱ्या शेकाप नेत्यांनी आतापर्यंत जाहीर केलेली नाही.

याउपर शेकापचे विधान परिषदेचे सदस्य बाळाराम पाटील यांनी तर यापूर्वी असे वक्तव्य केले होते की, आमचे साहेब (विवेक पाटील) बाहेर आल्यावर आम्ही अशी फटाकेबाजी करू की तुमच्या कानठळ्याच बसतील. त्यांच्या या वक्तव्यामुळे संतापलेल्या कर्नाळा बँकेच्या खातेदारांनी बाळाराम पाटील यांना असा प्रश्न केला आहे की, जेव्हा आपल्याच पक्षाचे माजी आमदार विवेक पाटील हे कर्नाळा बँकेचे खातेदार आणि ठेवीदारांचे पैसे बुडवण्याचे उद्योग करीत होते तेव्हा तुम्ही त्यांना का रोखू शकला नाहीत. तुम्ही तेव्हा त्यांना रोखले असते, तर त्यांच्यावर (विवेक पाटील यांच्यावर) जेलमध्ये जाण्याची वेळच नसती आली आणि कानठळ्या बसवणारे फटाके वाजवू, असेही आपल्याला बोलावे लागले नसते.

एकीकडे शेकापच्या नेत्यांनी कर्नाळा बँक राजरोसपणे लुटायची, दुसरीकडे कर्नाळा बँकेतील सामान्य ठेवीदारांकडून त्यांच्याच ठेवीवरील इन्श्युरन्सचे फॉर्म भरून घ्यायचे आणि त्यांना आपणच पैसे परत करत आहोत, असे भासवायचे हा शेकापचा दुटप्पीपणा आता संपूर्ण रायगड जिल्हा ओळखून आहे.

कर्नाळा बँकेच्या माध्यमातून सामान्य ठेवीदार आणि खातेदारांच्या पैशांची विवेक पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी लूट केली आणि या घोटाळ्यातून हाती आलेले पैसे हे आपल्या जवळच्या शेकाप कार्यकर्त्यांना निवडणुकीत वापरायला दिले. सामान्य कष्टकऱ्यांच्या पैशावर निवडणुका लढवून अवैध मार्गाने गब्बर झालेले शेकाप नेते आणि कार्यकर्ते हे सामान्य माणसाला विचारानेसे झाले. त्यामुळे भोळ्याभाबड्या जनतेचे शाप आता विवेक पाटील यांच्यासह शेकापलाही भोगावे लागत आहेत.

### पनवेलमध्ये गर्भाशय कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण

या वेळी रायगडचे माजी पालकमंत्री व विद्यमान आमदार रवींद्र चव्हाण, आमदार महेश बालदी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, तर भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापौर डॉ. कविता चौतमोल हे कार्यक्रमाचे निमंत्रक आहेत.

या बैठकीला भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, अॅड. मनोज भुजबळ, नगरसेविका चारुशीला घरत, राजेश्री वावेकर, सीता पाटील, अॅड. वृषाली वाघमारे, रूचिता लोंढे, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी लसीकरण कार्यक्रमाविषयी विचारविनिमय करण्यात आला.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
बुधवार, दि. २९ सप्टेंबर २०२१ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस
(वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. आरोग्य उपकेंद्र ६, रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. तळोजा शाळा, तळोजा गाव
- १२. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
- १३. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १४. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १५. श्री गणेश विद्यामंदिर प्राथमिक शाळा नंबर ६, धाकटा खांदा
- १६. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १७. आगरी शाळा, खांदा कॉलनी
- १८. सुधागड कॉलेज, कळंबोली
- १९. न्यु इंग्लिश स्कूल, कळंबोली
- २०. दत्तुशेठ पाटील हायस्कूल, कामोठे
- २१. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोवॅक्सिन

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल

पनवेल ग्रामीण लसीकरण

- १. वळवली रा.जि.प. शाळा
- २. रोहिंजण रा.जि.प. शाळा
- ३. मुर्बी रा.जि.प. शाळा
- ४. कोयनावेळे रा.जि.प. शाळा
- ५. पालेखुर्द रा.जि.प. शाळा
- ६. पेंधर रा.जि.प. शाळा
- ७. तळोजे मजकूर रा.जि.प. शाळा
- ८. कळंबोली काळभैरव मंदिर सभागृह
- ९. आसुडगाव रा.जि.प. शाळा
- १०. जुई गाव रा.जि.प. शाळा

निर्देशित केलेल्या लसीकरण केंद्रांवर पहिल्या डोसकरिता २०० व दुसऱ्या डोसकरिता १०० डोस उपलब्ध असतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी.
(वेळ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत)

# अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करा

## उरण भाजपचे सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन

**उरण : प्रतिनिधी**

रस्ते वाहतूक करताना होणाऱ्या अपघातासंदर्भात उरण तालुक्यातील पूर्व विभागाचे काही प्रश्न सार्वजनिक बांधकाम विभाग उरण येथे भाजप उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर यांच्या नेतृत्वाखाली बांधकाम विभागाचे अधिकारी ए. आर. सांगळे, सी. बी. बांगर यांच्यासमोर मांडून त्या समस्या सोडविण्याची मागणी करण्यात आली. वाहतूक व अपघातासंदर्भात तसे निवेदनही या वेळी देण्यात आले.

उरण तालुक्यात अपघातात मृत्यूंची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. सर्वसामान्य व्यक्तीला प्रवास करताना अनेक संकटाना तोंड द्यावे लागत आहे. मागील आठवड्यात २१ सप्टेंबर रोजी वशेणी येथील घरातील तरुण संदीप पाटील याचा अपघातात नाहक बळी गेला आहे. घरातील कर्ता पुरुषच गेल्याने अख्ख्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली. उरण तालुक्याचा विचार करता आजपर्यंत रस्ते अपघातात ८०० पेक्षा जास्त मृत्यू झाले आहेत.

निवेदनात प्रमुख्याने खोपटा पुलाजवळ प्रवेश करण्याच्या अगोदरच्या ठिकाणी गतिरोधक बांधणे, त्याचप्रमाणे कोप्रोली येथील ग्लोबिकॉन कंपनीजवळ गतिरोधक बांधणे, सिद्धी विनायक हॉस्पिटल येथेही गतिरोधक बांधणे, कॉन्टिनेंटलजवळील पुलाला लागून असलेले डिवायडर बंद करणे, कॉन्टिनेंटल ब्रिजजवळील वळण बंद करणे, मुख्य रस्त्यावर विजेचे खांब, डिवायडर येथे तसेच मुख्य रस्त्यावर वाढलेली झाडेझुडपे त्वरित तोडणे, अशा विविध मागण्या करण्यात आल्या. या वेळी भाजप पूर्व विभाग अध्यक्ष शशीकांत पाटील, वाहतूक सेल तालुकाध्यक्ष सुदेश पाटील, युवा विभाग सचिव कल्पेश म्हात्रे, कोप्रोली कार्याध्यक्ष निलेश पाटील, कोप्रोली शाखा चिटणीस प्रितम म्हात्रे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



# खारघरमधील रस्ते दुरुस्तीचे संयुक्त सर्वेक्षण व्हावे

**खारघर : रामप्रहर वृत्त**

येथील खराब रस्ते व पावसाळ्यात पडणारे प्रचंड खड्डे याबाबत कार्यकारी अभियंता तात्यासाहेब अहिरे यांना खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांच्या नेतृत्वाखाली खारघर, तळोजा मंडलातील नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी भेटून निवेदन दिले. संयुक्त सर्वेक्षण झाल्यास निकृष्ट दर्जाच्या कामांना आळा घातला जाईल, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली.



२०१६ पासून पाठपुरावा केल्यावर खारघरमधील काही रस्त्यांचे रिसर्फेसिंग झाले, पण आज आपण या रस्त्यावरून फिरलात तर आपल्या लक्षात येईल की खड्डे सर्व ठिकाणी पडले आहेत. याबाबत अभियंत्यांना निवेदन देताना स्पष्ट करण्यात आले की, डांबरीकरण योग्य नसल्याने काही दिवसांतच रस्त्यांवर खड्डे पडतात. अशा वेळी संयुक्त सर्वेक्षण झाल्यास अशा निकृष्ट दर्जाच्या कामांना आळा घातला जाईल. पनवेल महानगरपालिकेच्या हस्तांतरणाचे कारण पुढे न करता पावसाळ्यानंतर सर्वेक्षण करून खराब रस्त्यांचे डांबरीकरण करून देण्यात यावे. श्री. अहिरे यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद देत पावसाळ्यानंतर या रस्त्यांचे डांबरीकरण करून घेऊ, असे आश्वासन दिले.पावसाळ्यानंतर संयुक्त सर्वेक्षण करून रस्त्यांचे उत्कृष्ट दर्जाचे डांबरीकरण सिडकोमार्फत करण्याचा भारतीय जनता पार्टी खारघर तळोजा मंडळाच्या नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी निश्चय केला आहे. तसे आश्वासन सिडको अधिकाऱ्यांनीही दिले आहे.

### ब्रिजेश पटेल यांची मागणी

या वेळी खारघर-तळोजा मंडलाचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक अभिमन्यु पाटील, नगरसेवक प्रवीण पाटील, रामजी बेरा, हर्षदा उपाध्याय, सरचिटणीस दीपक शिंदे, उपाध्यक्ष संजय घरत, उपाध्यक्ष दिलीप जाधव, अमर उपाध्याय, सुमित सहाय आदी उपस्थित होते.

# एटीएम कार्ड बदलून एक लाखाला गंडा

**उरण : प्रतिनिधी**

एटीएम सेंटरमध्ये उभ्या असलेल्या एका अनोळखी व्यक्तीने हातचलाखी करून एका व्यक्तीचे एटीएम कार्ड बदलून एक लाख आठ हजार रुपये लंपास केल्याची घटना उरण तालुक्यातील जासई येथे घडली. या प्रकरणी उरण पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरोधात चोरी आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव ओमप्रकाश संतराज निशाद आहे. ते २१ तारखेला जासई गावाजवळील एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी आपल्या मित्रासमवेत गेले. तेथे दुसऱ्या एटीएम मशीनमध्ये एक अनोळखी इसम पैसे काढत होता. निशाद यांनी १० हजार रुपये काढले. त्याच वेळी त्यांना फोन आल्याने ते कार्ड घेऊन बाहेर आले आणि आपला मित्र गणेश सहानी याला एटीएममधून रक्कम काढण्यास सांगितले.

गणेश हा एटीएममध्ये कार्ड टाकून पिन विचारण्यासाठी बाहेर आला. त्या वेळी त्या अनोळखी व्यक्तीने त्याचे कार्ड बदलले आणि निशादने गणेशला सांगितलेला पिन चोरून ऐकला. काही वेळाने त्यांच्या खात्यातून एक लाख आठ हजार रुपये कमी झाल्याचे लक्षात आले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी याबाबत उरण पोलीस ठाण्यात या अनोळखी व्यक्तीविरोधात तक्रार दाखल केली आहे. उरण पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.



**उरण : जासई स्कूलचे मुख्याध्यापक अरुण घाग, कामगार नेते सुरेश पाटील, रयत सेवक संघाचे उपाध्यक्ष नूरा शेख, बीएमएसचे तालुका अध्यक्ष लकेश म्हात्रे यांनी आमदार महेश बालदी यांची सदिच्छा भेट घेतली.**



## गरजूंना जीवनावश्यक किटचे वाटप

**पनवेल :** हुवेई कंपनीच्या वतीने आणि पनवेल पोलिसांच्या पुढाकाराने पनवेल परिसरातील ५८५ गरजवंत कुटुंबांना मदतीचा हात म्हणून शहरातील सिंधी पंचायत सभागृह, गोखले सभागृह व पळस्पे बिट परिसर येथे जीवनावश्यक किटचे वाटप करण्यात आले. यात प्रामुख्याने अन्नधान्यासह कोरोना खबरदारीच्या अनुषंगाने मास्क, सॅनिटायझर, साबण, तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी वह्यांचे वाटपही करण्यात आले.

परिमंडळ-२चे सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनावणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे, निरीक्षक विजय कादबाने, सहाय्यक निरीक्षक हुलगे आदींच्या उपस्थितीत हे वाटप करण्यात आले.

# ‘कोकणात पर्यटनासाठी मोठी संधी उपलब्ध होईल’

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागात कृषी पर्यटनाला मोठी संधी असून ४० कृषी पर्यटन केंद्रांना मंजुरी देण्यात आली असून ती पर्यटकांसाठी खुली केली आहेत. त्या माध्यमातून कोकणात पर्यटनासाठी मोठी संधी उपलब्ध होईल, असे कोकण विभागीय उपायुक्त मनोज रानडे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



जागतिक पर्यटन दिनानिमित्त पर्यटन संचालनालनालयाच्या अधिनस्त असलेले उपसंचालक (पर्यटन) प्रादेशिक कार्यालय नवी मुंबई यांच्या वतीने पत्रकार परिषद आयोजित केली होती. त्यात ते बोलत होते. या पत्रकार परिषदेत उपसंचालक (पर्यटन) हनुमंत हेडे, उपसंचालक (माहिती) डॉ. गणेश मुळे, कर्नाळा पक्षी अभयारण्याचे वनक्षेत्रपाल डी. एन. राठोड, निसर्ग हॉस्पिटॅलिटीचे संचालक संजय नाईक, तसेच पत्रकार उपस्थित होते.

या वेळी २ ते ८ ऑक्टोबरदरम्यान फणसाड, कर्नाळा अभयारण्य जंगल ट्रेल लिफलेटचे प्रकाशन करण्यात आले. कोकण विभागातील कृषी उद्योजक, हॉटेल, रिसॉर्ट उद्योजक यांना पर्यटन संचालनालयाकडे असलेल्या योजनांचा फायदा घेऊन पर्यटन व्यवसायात एक उत्साहाचे वातारण निर्माण करण्यासाठी, तसेच रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी पर्यटन संचालनालय प्रादेशिक पर्यटन कार्यालय कोकण विभाग यांच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून फणसाड वन्यजीव अभयारण्य व कर्नाळा पक्षी अभयारण्याची जंगल ट्रेल अशी एकदिवशीय सहल २ ते ८ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. निसर्ग हॉस्पिटॅलिटीचे संचालक संजय नाईक हे या सहलीचे आयोजन करणार आहेत.

कोकणातील समुद्र किनाऱ्यालगत शासकीय व खाजगी जमिनीवर आरामखुर्च्या आणि मोठ्या छत्र्यांसह तात्पुरत्या हंगामी चौपाटी कुट्या (बीच शॅक), सार्वजनिक चौपाटी सुविधा केंद्र उभारण्यासाठीचे बीच पर्यटन धोरण राबविण्यात येणार आहे. राज्यातील पर्यटन विकास अधिक सक्षम व्हावा म्हणून पर्यटन विभागांतर्गत पर्यटन संचालनालयाची निर्मिती करण्यात आली असून एप्रिल २०१९ पासून राज्यातील प्रत्येक महसुली विभागात प्रादेशिक कार्यालय उभारण्यात आले आहे. कोकण विभागाचे प्रादेशिक कार्यालय कोकण भवन सातवा मजला सीबीडी बेलापूर नवी मुंबई या ठिकाणी नुकतेच कार्यरत झाले आहे. या विभागात कोकणातील सात जिल्ह्यांचे समायोजन करण्यात आले आहे.

# विसर्जन घाटावर पाण्यात बुडणाऱ्यांना पोलिसाने वाचविले

**पनवेल : वार्ताहर**



तक्का येथील गणपती विसर्जन घाटात शनिवारी (दि. २५) गौरा गणपतीचे विसर्जन करण्याकरिता पाण्यात उतरलेल्या दोन व्यक्तींना पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडत होते. ही घटना लक्षात येताच शहर पोलीस ठाण्यातील पोलीस नाईक महेश पाटील यांनी जीवाची बाजी लावत त्या पाण्यात बुडणाऱ्यांना वाचविले. या धाडसी कामगिरीमुळे पाटील यांना वरिष्ठांनी कौतुकाची थाप दिली आहे.

### महेश पाटील यांचे कौतुक

भाद्रपदात येणाऱ्या संकष्ट चतुर्थीला अनेक घरात आणि सार्वजनिक ठिकाणी गौरा गणपती बसवण्याची जुनी परंपरा आहे. या गणपतीला साखरचौथ गणपती असे संबोधले जाते. या गणपती बाप्पाच्या विसर्जनाकरिता आलेले एक ५० वर्षीय, तर दुसरा २५ वर्षीय व्यक्ती पाण्यात उतरले व पुढे-पुढे जाऊ लागले. या वेळी ते दोघेही खोलवर पाण्यात गेल्याने पाण्यात बुडू लागले. या वेळी त्या ठिकाणी अंधार असतानाही पोलीस नाईक महेश पाटील यांनी जीवाची बाजी लावत या नदीतील खोलवर पाण्यात उडी मारून त्या बुडणाऱ्या दोघा व्यक्तींना बाहेर काढले व त्यांचे प्राण वाचविले. महेश पाटील यांनी केलेल्या कामगिरीमुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आदिवासी महिलांना तराजू, शिलाई यंत्रांचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील कर्नाळा परिसरातील रानभाज्या विकून उदरनिर्वाह करणाऱ्या आदिवासी महिलांना मुंबईच्या अर्चना ट्रस्टकडून सोमवारी (दि. २७) तराजू व शिलाई यंत्रांचे वाटप करण्यात आले. कल्हे गावाशेजारी मुंबई-गोवा महामार्गाच्या कडेला परिसरातील अनेक आदिवासी महिला आपल्या उदरनिर्वाहासाठी जंगलातील रानभाज्या, पालेभाज्या व कंदमुळे विकत असतात. अशा ४५ महिलांना त्यांच्या रोजगार वृद्धीसाठी तराजू, भाजी ठेवण्यासाठी मोठी टोपली आणि पाच आदिवासी महिलांना शिलाई यंत्रांचे मोफत वाटप करण्यात आले. या वेळी संतोष ठाकूर, चंद्रकांत पाटील, जीवन टाकले, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील प्रदीप सोलस्कर, संतोष हापसे, अर्चना ट्रस्टचे कार्यकर्ते रत्नाकर घरत, संजय म्हात्रे, निलेश पाटील आदी उपस्थित होते. या मदतीबद्दल आदिवासी महिलांनी अर्चना ट्रस्टचे आभार मानले.



# पनवेलमध्ये रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील काळण समाज हॉलमध्ये रविवारी (दि. २६) रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी रक्तदाते व नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला.



काळण समाज मध्यवर्ती, रोटरी क्लब ऑफ खारघर एक्झिक्युटिव्ह, रेनोवेअर हेल्थ केअर सोल्युशन, सह्याद्री ब्लड डोनर्स ग्रुप, राजे शिवराय प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या रक्तदान शिबिरात तब्बल ११८ रक्तदात्यांनी सहभाग घेतला.

या उपक्रमात खारघरच्या टाटा मेमोरियल सेंटर व सद्गुरू रक्तपेढी या संस्थेने विशेष मोलाचे सहकार्य केले, तर रक्तदात्यांना मदत करणाऱ्या संस्थेचे अमोल साखरे आणि उन्मेश लोहार तसेच राजे शिवाजी प्रतिष्ठानचे संजय पाटील आणि अक्षय मिसाळ यांनी परिश्रम घेतले.

काळण समाज मध्यवर्तीचे अध्यक्ष सुखदेव तेजे यांनी या उपक्रमात समाजाला सहभागी करून घेतल्याबद्दल व रक्तदात्यांनी दिलेल्या भरघोस सहभागाबद्दल सर्वांचे आभार मानले.

# उरणमध्ये पल्स पोलिओ लसीकरण

**उरण : वार्ताहर**

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत पाच वर्षाआतील बालकांना पल्स पोलिओ डोस दिला जातो. उरण शहरात पल्स पोलिओ लसीकरण मोहीम रविवारी (दि. २६) उरण शहरात इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. गौतम देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.



पल्स पोलिओच्या दिवशी जी बालके वंचित राहिली असतील त्यांना पुढील चार दिवस घरोघरी जाऊन डोस दिला जाणार आहे. डॉ. गौतम देसाई यांच्या हस्ते बालकांना डोस देण्यात आले. या वेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. मृणालिनी कदम, सहाय्यक अधीक्षक अनिल ठाकूर, अधिपरिचारिका निवेदिता कोटकर, तसेच कृपा पाटील, आरोग्यसेवक एस. एस. घरत, आरोग्य सहाय्यक एच. जे. पगारे व अमृतकर आदी उपस्थित होते.

उरण शहराच्या हद्दीत बूथ १०, ट्रांझिस्ट टीम ३, मोबाइल टीम १ असे एकूण १४ बूथ असून मोरा जेट्टी दत्त मंदिर मोरा, नगरपालिका शाळा नं. ३ मोरा, सॉल्ट ऑफिस भवरा मांगीर देव, बोरी नाका, इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय, उरण एनआय हायस्कूल सेंट मेरी स्कूल, जकात नाका, समाज मंदिर उरण, कोट नाका-मिठागर कार्यालय, कोकण ज्ञानपीठ कॉलेज आदी ठिकाणी बालकांना पोलिओ डोस देण्यात आले.

## संपादकीय

# आता मराठवाडा संकटात

कोकणानंतर आता मराठवाड्यात पावसाने हाहाकार माजवला असून गेल्या १४ दिवसांत औरंगाबाद, बीड, नांदेड, लातूर परिसरात पावसामुळे ३५ जणांचा बळी गेल्याचे समजते. याखेरीज शेतीचेही प्रचंड नुकसान झाले असून राज्य सरकारकडून कुठलीही मदत मिळू शकेल, अशी आशाही लोकांना वाटेनाशी झाली आहे. नैसर्गिक आपत्तींमध्ये भरडून निघालेल्या रायगड, तसेच कोकणवासीयांनाही अद्याप आवश्यक तितकी मदत मिळालेली नाही. सत्तेला चिकटून राहण्यातच मश्गुल असलेल्या सरकारकडून नागरिकांनी अपेक्षा तरी कशाची ठेवावी?

**कोकणाला पुरते झोडपून काढल्यानंतर नैसर्गिक आपत्तीने आता मराठवाड्याकडे मोर्चा वळवल्यासारखे दिसते आहे. एरव्ही पाण्याचे नको तितके दुर्भिक्ष असणाऱ्या मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये गेले काही दिवस मुसळधार पाऊस सुरू आहे. गुलाब चक्रीवादळानंतर निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे मराठवाड्यात, मध्य महाराष्ट्रात व उत्तर कोकणात अतिवृष्टी होईल असा इशारा हवामान खात्याने दिला होता. हवामान खात्याचा हा अंदाज खरा ठरला असून मराठवाड्यातील बहुतेक जिल्ह्यांतील नद्या ओसंडून वाहात आहेत. धरणे वाहू लागल्यामुळे अनेक गावांमध्ये धोक्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. उस्मानाबाद, बीड या जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे कित्येक हेक्टर शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. सोयाबीनचे पीक पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. नांदेड व औरंगाबाद जिल्ह्यांतही जनजीवन विस्कळीत झाले असून जालन्यातील केळणा नदीला पूर आल्याने तेथील महामार्गावरील वाहतूकही बंद करण्यात आली आहे. या अतिवृष्टीचा फटका विदर्भालाही बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आधी कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि आता मराठवाडा, कशामुळे कोण जाणे पण निसर्ग महाराष्ट्राच्या मागे जणू हात धुऊन लागल्यासारखी परिस्थिती सातत्याने दिसते आहे. कोकणपट्टीला निसर्ग आणि तौक्ते चक्रीवादळांनी झोडपले. एकीकडे कोरोना महामारीचे संकट, त्यातून ओढवलेली आर्थिक डबघाईची परिस्थिती आणि त्यात पुन्हा-पुन्हा बसणारे नैसर्गिक संकटांचे फटके. महाराष्ट्रातील जनता या साऱ्याला कसे तोंड देते आहे ते जनतेलाच ठाऊक. तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत, आवश्यकता भासल्यास लोकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात येईल आदी नेहमीच्याच वक्तव्यांपलीकडे सरकार हालचाल करताना दिसत नाही. पुराचा जबरदस्त फटका बसलेले कित्येक चिपळूणकर अद्यापही सावरलेले नाहीत. मराठवाड्यातील जनतेवरही तशीच वेळ ओढवेल असे काहीसे चित्र सध्या दिसते आहे. जनावरे वाहून जाणे, बस पुराच्या पाण्यात कोसळणे या अशा दुर्घटना टाळण्यासाठी वेळीच खबरदारी घेणे शक्य नाही का? अतिवृष्टीचा अंदाज आधीच जाहीर झालेला असूनही प्रशासन या दुर्घटना का टाळू शकत नाही? पावसाचे स्वरूप बदलते आहे. जगभरातच हवामान बदलाच्या दुष्परिणामांची झळ अनेक देशांना बसत असून विशेषत: भारतातील मान्सूनचे स्वरूप यामुळेच बदलत जाणार आहे हे आता स्पष्ट झाले आहे. एकीकडे या बदलांवर व्यापक उपाय योजण्याचे प्रयत्न जागतिक स्तरांवर होत राहतील, मात्र त्याच वेळी राज्य स्तरावर आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा बळकट करण्याकडे अधिक लक्ष द्यावे लागणार आहे, परंतु आजवरचा अनुभव पाहता तिघाडी सरकार याही बाबतीत काही उल्लेखनीय करू शकेल अशी आशा जनतेला वाटत नाही. सातत्याने गोंधळयुक्त कामगिरी करणारे सरकार आणि पुन्हा पुन्हा वाट्याला येणारा निसर्गाचा प्रकोप या दोन्हीमुळे भरडली जाणार आहे ती हतबल जनताच.**

# माणगाव एसटी स्टँड की चंद्रभूमी?

खबरबात
नितीन देशमुख

केंद्रीय मंत्री नारायण राणेंनी कोकणात विमानसेवा सुरू करण्याची घोषणा केली. आपल्या कोकणात येणारे विमान पाहायला कोकणी माणूस गर्दी करणार हे लक्षात येताच राणेंना शह देण्यासाठी सेनेचे परिवहन मंत्री अ‍ॅड. अनिल परबांनी आपल्या परिवहन महामंडळातर्फे कोकणी माणसाला चंद्रसफरीचा अनुभव देण्याची सोय केली. आश्चर्य वाटले ना, मग रायगड जिल्ह्यातील माणगावला एकदा भेट द्याच. तेथे त्यांनी खास चंद्रभूमी बनवली आहे. एसटी स्टँडमध्ये प्रवेश करतानाच तुम्हाला चंद्रभूमीवर ज्याप्रमाणे उड्या मारीत अवकाश यात्री चालताना दिसतात तशा उड्या मारीत चालण्याचा अनुभव घेता येतो, तेही एसटीच्या तिकिटात कोणतीही वाढ न करता.



माणगाव हे रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण. मुंबई-गोवा आणि दिघी-औरंगाबाद-हैदराबाद हे दोन राष्ट्रीय महामार्ग येथून जात असल्याने येथील एसटीचे हे महत्त्वाचे स्थानक आहे. रोज शेकडो गाड्या व हजारो प्रवासी या स्टँडवर येत असतात. या स्टँडमध्ये रायगड जिल्ह्यातील महाड, श्रीवर्धन, रोहा, मुरुड, पनवेल डेपोबरोबरच रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पुणे जिल्ह्यात जाणाऱ्या ३५० पेक्षा जास्त गाड्यांची रोज ये-जा असते. दरवर्षी पावसाळ्यात या एसटी स्टँडच्या प्रवेशद्वारावरच मोठ्या खड्ड्यात कायम पाणी साठलेले असते. या वर्षी तर संपूर्ण स्टँडमध्ये सगळीकडे खड्ड्यांचेच साम्राज्य झाले आहे. त्यामुळे चालत जाणे ही मुश्किल झाले आहे. त्यातच प्रवासी बसतात तेथील स्लॅब पाडण्यात आला आहे. तेथे टाकलेले पत्रे चक्रीवादळात उडून गेले. गणेशोत्सवानंतर आता त्या ठिकाणी तात्पुरते पत्रे टाकण्यात आले आहेत, मात्र येथील खड्डे भरण्याचे काम घेतलेला ठेकेदार काम करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे समजते.

माणगाव हे तालुक्याचे ठिकाण असतानाही येथे पूर्वी साधी प्रवासी शेड होती. लांब पल्ल्याच्या गाड्या येथे थांबत नव्हत्या, कारण १० किमी अंतरावर असलेल्या इंदापूर या त्या वेळच्या छोट्याशा खेड्यात पुणे जिल्ह्यातील इंदापूरला मंजूर झालेला एसटी स्टँड महामंडळाच्या ठेकेदाराने बांधला होता. ही चूक उद्घाटनाच्या वेळेला लक्षात आली. त्यामुळे माणगावला तालुक्याचे ठिकाण असूनही तेथे स्टँड बांधण्यात आला नाही. १९७७ मध्ये अण्णा सुर्वे, रमेश देशमुख, संजय साबळे व अरुण सुर्वे यांनी पुढाकार घेऊन माणगावला स्टँड आणि जलद गाड्या थांबवण्यासाठी प्रयत्न सुरू केले. दरम्यान, पेणचे भाई शेट्ये एसटी महामंडळाचे सदस्य झाले. त्यांनी एसटी महामंडळाकडून माणगावला स्टँड मंजूर करून घेतला. त्यांच्याच हस्ते ५ ऑगस्ट १९७८ ला त्याचे भूमिपूजन झाले. माणगाव एसटी स्टँडचे काम १९८६-८७ मध्ये पूर्ण झाले.

माणगावला मोठा स्टँड बांधून झाला, तरी रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात जाणाऱ्या सगळ्या गाड्या येथे थांबत नव्हत्या. कारण येथे कॅन्टीनची सोय करण्यात आली नव्हती. पेण सोडल्यानंतर महाडपर्यंत ९० किमी अंतरात गाडीला काही झाले, तर डेपो नसल्याने मदत मिळण्यास वेळ लागत होता. त्यामुळे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या माणगावला स्टँडच्या मागे असलेल्या जागेत डेपो व्हावा, अशी मागणी करण्यात आली, पण नवीन डेपोला परवानगी द्यायची नाही, असे धोरण असल्याचे सांगून महामंडळाने नकार दिला. अखेर पत्रकारांनी उपोषण करण्याचे जाहीर केले. त्यामध्ये माजी आमदार अशोक साबळे ही सहभागी झाले. रात्री उशिरा तत्कालीन नगरविकास राज्यमंत्री सुनील तटकरे यांनी येऊन मंजुरीचे पत्र दिले. त्या वेळी त्यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागले होते. त्यानंतर त्याचा परिणाम रायगड जिल्ह्यातील राजकारणावरही झाला. १४ एप्रिल २०११ रोजी महामंडळाचे तत्कालीन अध्यक्ष सुधाकर परिचारक यांच्या हस्ते व नामदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत माणगाव एसटी डेपोचे उद्घाटन झाले. या डेपोत सध्या ४२ चालक, ४७ वाहक आणि चालक-वाहक (चावा) ३९ अशा १४० जणांमार्फत ३७ गाड्यांच्या मदतीने ३२ शेड्युल चालवले जात आहेत.



माणगाव एसटी स्टँडची आजची अवस्था पाहिल्यावर आपण चंद्रावर तर आलो नाही ना, असा भास होतो. एसटी प्रशासनाबरोबरच स्थानिक नेतृत्वही याला जबाबदार असल्याचे म्हटले, तर चुकीचे ठरणार नाही. रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे महिन्यातून अनेक वेळा माणगाव स्टँड समोरून जातात, पण त्यांच्या पक्षाच्या एकाही नेत्याला किंवा कार्यकर्त्याला माणगाव एसटी स्टँडच्या दुरवस्थेकडे त्यांचे लक्ष वेधता आले नाही, हे दुर्दैव आहे. परिवहन मंत्री अ‍ॅड. अनिल परब कोकणातले आहेत, तर राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांचा बंगला माणगाव एसटी स्टँडच्या पाठीमागे आहे. दोघेही शिवसेनेचे आहेत, मात्र त्याच्या नजरेस माणगाव एसटी स्टँडची दैनावस्था आणून देण्यास सेनेच्या येथील उपजिल्हा प्रमुखांना भंगारच्या भांडणातून वेळ मिळत नाही. शेकापच्या स्थानिक नेत्यांना चमकोगिरी करण्यास वेळ पुरत नाही.

खड्ड्यांत गेलेल्या माणगाव एसटी आगारला सुस्थितीत आणण्यासाठी भाजपचे तालुका अध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांनी कंबर कसली आहे. प्रयत्न करूनही एसटी महामंडळ जागे होत नसल्याचे पाहून ते आक्रमक झाले आहेत. माणगाव एसटी आगार खड्डेमुक्त झाले नाही, तर येत्या शुक्रवारी (दि. १) येथील स्टँडमध्ये येणाऱ्या एसटीच्या सर्व गाड्या अडविण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून सामान्य जनतेसाठी सर्व पक्षाचे नेते या रस्ता रोको आंदोलनात सहभागी झाले, तरच हे माणगाव एसटी स्टँडमधील खड्डे भरले जाऊन नवीन स्टँड बांधण्याच्या कामाला गती मिळेल, हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

# माणगाव बसस्थानक खड्डेमुक्त करा

## अन्यथा रास्ता रोको; भाजपचे तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांचा इशारा

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील बसस्थानक पूर्णपणे खड्ड्यात गेले असून त्यात पावसाचे पाणी साचले आहे. या खड्ड्यांमुळे वाहनचालक, प्रवासी त्रस्त झाले आहेत. हे बसस्थानक त्वरित खड्डेमुक्त करावे, अन्यथा शुक्रवारी (दि. १) बसस्थानकासमोर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा भाजपचे तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांनी माणगाव एसटी आगार व्यवस्थापकांना दिला आहे.


(छाया : सलीम शेख)

ढवळे यांनी सोमवारी (दि. २७) माणगाव एसटी आगार व्यवस्थापक चेतन देवधर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माणगाव बसस्थानक परिसरात प्रचंड खड्डे पडले असून ही समस्या गेल्या अनेक वर्षापासून आहे, मात्र राज्य परिवहन महामंडळ त्याकडे डोळेझाक करीत आहे. स्थानकातील संपूर्ण रस्ता चांगल्या दर्जाचा होणे आवश्यक आहे. माणगाव एसटी बसस्थानक खड्डेमुक्त करून तेथील रस्त्याचे काँक्रीटीकरण करावे, अन्यथा शुक्रवारी एसटी बसेस अडवून रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल.

आगार व्यवस्थापक चेतन देवधर यांना निवेदन देताना भाजपचे तालुका उपाध्यक्ष बाबुराव चव्हाण, खजिनदार संजय जाधव, साई विभागीय अध्यक्ष अरुण पेणकर, महिला मोर्चा विभागीय अध्यक्षा रेश्मा मोहिते आदी उपस्थित होते. दरम्यान, भाजपच्या रास्ता रोको आंदोलनाला माणगाव तालुका पत्रकार संघाने पाठिंबा दिला आहे.

# पुराने नुकसान झालेल्या शाळेला मदतीचा ओघ

## सुधागड पडसरे आश्रमशाळेतील शिक्षक राजू मोरे यांची मोहीम

**पाली : प्रतिनिधी**

अतिवृष्टी व महापुरामुळे काकरतळे येथील आदर्श विद्यालयाचे अतोनात नुकसान झाले. शाळेला मदत मिळण्यासाठी पडसरे आश्रमशाळेचे शिक्षक राजू मोरे यांनी व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप, फेसबुक यांच्यावर 'चला एक शाळा उभी करू या' ही मोहीम राबविली. त्याला प्रतिसाद देत अनेक ओळखीच्या व अनोळखी हातांनी मदत केली. यातून जमलेल्या ४१ हजार १०३ रुपयांचा निधी नुकताच राजू मोरे यांनी काकरतळे शाळेकडे सुपूर्द केला.


(छाया : धम्मशील सावंत)

शिवाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या काकरतळे येथील आदर्श विद्यालयाचे पुरामध्ये खूप नुकसान झाले. त्याची माहिती व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप, फेसबुकच्या माध्यमातून प्रसारित करून विद्यालयाच्या मदतीसाठी आवाहन केले होते. त्याला स्थानिक पातळीबरोबरच मुंबई, इगतपुरी (जि. नाशिक), बिटरगाव (जि. यवतमाळ) छत्तीसगडमधूनही प्रतिसाद मिळाला. त्यातून जमा झालेली मदत स्वतःच्या योगदानासह आदर्श विद्यालयाकडे सुपूर्द केली असल्याचे राजू मोरे यांनी सांगितले. शिवाई शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी व शाळेचे मुख्याध्यापक एम. बी. जायाप्पा यांनी राजू मोरे यांचे आभार मानले.

# कर्जत कळंब येथे बदली झालेल्या कर्मचाऱ्यांचा सन्मान

**कर्जत : बातमीदार**

नेरळ पोलीस ठाण्यांतर्गत कळंब आऊटपोस्ट चौकीत कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या अन्यत्र बदल्या झाल्या आहेत. त्या सर्व पोलीस कर्मचाऱ्यांचा पोलीस पाटील संघटनेच्या कळंब विभागाच्या वतीने गौरव करण्यात आला.

कळंब चौकी अंतर्गत सुमारे ६० गावे येतात. अपुरे कर्मचारी असताना सहाय्यक पोलीस निरीक्षक केतन सांगळे यांनी या भागातील गुन्हेगारी रोखण्यासाठी प्रयत्न केले. त्यांची बदली झाल्यामुळे पोलीस पाटील संघटनेच्या कळंब विभागाच्या वतीने केतन सांगळे यांचा सत्कार करण्यात आला.

कर्जत तालुक्यातील पोही गावचे पोलीस पाटील दत्तात्रेय भोईर यांच्या पुढाकाराने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला नेरळ विभाग पोलीस पाटील संघटना अध्यक्ष मधुकर डायरे, उपाध्यक्ष संतोष जाधव, महिला उपाध्यक्ष माधुरी खैरे, तसेच पोलीस पाटील स्वाती म्हसे, चंद्रकांत भालेराव, भरत पाटील, अश्विनी बदे, राहुल राणे, अशोक भोईर, सुगंधा एकनाथ शेळके, जनार्दन पारधी, रेवता निरगुडा, अलका कराळे, सामजिक कार्यकर्ते सुनील म्हसे, संतोष बदे, कळंब तंटामुक्ती गाव अध्यक्ष नामदेव बदे, माजी सरपंच फाईक खान, तसेच कळंब चौकीचे नवनियुक्त सहाय्यक निरीक्षक सुनील शेमडे, पोलीस कर्मचारी भरत गर्जे, निरंजन दवणे, मनीष खुणे आणि ग्रामस्थ उपस्थित होते.


(छाया : संतोष पेरणे)

# आदिवासी कुटुंबाचा रहदारीचा मार्ग बंद

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा पोलिसांत चौघांविरोधात गुन्हा दाखल

तालुक्यातील कोंझरी गावातील आदिवासी कुटुंबाचा रहदारीचा रस्ता बंद करणाऱ्या चौघा जणांवर म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोंझरी गावातील आदिवासी कुटुंबाच्या रहदारीच्या मार्गावर खड्डा खोदून सदरचा रस्ता हेतुपुरस्सर बंद केला आहे. या प्रकरणी शेवंता सिताराम पवार (वय ४५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सदानंद विचारे, दिलीप विचारे, बळीराम विचारे (सर्व रा. कोंझरी) आणि महेश पवार (रा. कलेटे) यांच्या विरोधात म्हसळा पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३२३, ५०४, ५०६, ३४ सह अनुसूचित जाती जमाती आत्याचार कायदा १९८९ चे कलम ३ (१)(एफ) (जी) (एस)(आर) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# प्रेरणा मतिमंद मुलांच्या शाळेची नवीन कार्यकारिणी जाहीर

**रोहे : प्रतिनिधी**

ज्ञानगंगा बहुविकलांग संस्थेच्या रोहा येथील प्रेरणा मतिमंद मुलांच्या शाळेच्या अध्यक्षपदी दर्शना आठवले, तर सचिवपदी अशोक जोशी यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

प्रेरणा मतिमंद मुलांच्या शाळेची विशेष सभा रविवारी (दि. २६) रोह्यातील मेहेंदळे हायस्कूल समोरील दगडी शाळेच्या सभागृहात घेण्यात आली. या सभेत नवीन कार्यकारिणी निवड करण्यात आली. त्यात संजय आर्ते (उपाध्यक्ष), राजश्री आठवले (सहसचिव), रामनरेश कुशवाहा (खजिनदार), श्रीनिवास वडके (सहखजिनदार) यांचा समावेश आहे.


(छाया : महादेव सरसंबे)

# पालीत माकडे आणि वानरांचा उच्छाद

## उपद्रवामुळे नागरिक हैराण; कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी

**पाली : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील पाली गावात माकड व वानरांचा उच्छाद वाढत चालला आहे. त्यांच्या उपद्रवामुळे ग्रामस्थ हैराण झाले आहेत. मालमत्तेच्या नुकसानीबरोबरच काही ग्रामस्थांना या माकडांनी जखमी केले आहे. त्यामुळे या वानर व माकडांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी वनविभाग व तालुका प्रशासनाकडे ग्रामस्थांनी केली आहे.

पाली गावातील राम आळी, बाजारपेठ, देऊळवाडा, मधली आळी, खडकाळी, कासार आळी, सोनार आळी, आगर आळी, बेगरआळी, उंबरवाडी, सावंत आळी अशा गजबजलेल्या भागात माकडे आणि वानरे रोज धुमाकूळ घालत आहेत. मोठमोठी वानरे आणि माकडे उड्या मारून घराचे पत्रे व कौले फोडतात, तसेच ड्रेनेजचे पाईप, विजेच्या तारा, गच्चीत ठेवलेले सामान, पाण्याच्या टाक्या, कुंड्या, झाडे यांचे नुकसान करत आहेत. त्यांच्या या उपद्रवामुळे झाडे, फळे, फुले यांची हानी होत आहे. घरात शिरून माकडे अन्नधान्य, भाजीपाला यांची नासाडी करतात. त्यामुळे घराची दारे, खिडक्याही उघड्या ठेवणे अवघड झाले. इतकेच नव्हे तर वाळत घातलेले कपडेदेखील फाडून टाकतात. यामुळे बाहेर वाळवण घालता येत नाही.





### नागरिकांमध्ये घबराट

*माकडे आणि वानरे यांच्या वावरामुळे घरातील लहान मुले, वयोवृद्ध यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. वर्षभरात या वानरांनी महिला व लहान मुलांसह अनेकांवर जीवघेणे हल्ले करून गंभीर दुखापत केली आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये घबराट आहे. दिवसेंदिवस वानरांची व माकडांची संख्या वाढत आहे.*

**पालीतील वानर व माकडांचा बंदोबस्त करण्यासाठी नोव्हेंबर महिन्यात जिल्हा प्रशासनाकडे लेखी निवेदन दिले आहे. त्यांनी स्थानिक वनविभागाला यासंदर्भात कारवाई करण्याचे पत्र पाठविले आहे, मात्र वनविभागाने अजून कोणतीही कारवाई केलेली दिसत नाही. वनविभाग व प्रशासनाने वेळीच उपाययोजना करावी.**

**-विद्येश आचार्य, ग्रामस्थ, पाली, ता. सुधागड**

# तुफान पावसात किरीट सोमय्यांचे खोपोलीत स्वागत

**खोपोली : प्रतिनिधी**

सत्ताधारी ठाकरे सरकारमधील मंत्र्यांवर कथित आर्थिक घोटाळ्याबाबत आरोप करणारे भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांचे खोपोली शिळफाटा येथे जोरदार स्वागत करण्यात आले. तीन तास प्रतीक्षा व पर्जन्यराजाची तुफान फटकेबाजी सुरू असतानाही कार्यकर्त्यांचा उत्साह मात्र ओसरला नाही.

किरीट सोमय्या यांचा कोल्हापूरला नियोजित दौरा होता. ते मुंबई-पुणे जुन्या महामार्गाने जाणार होते. यासाठी ते पनवेल, खोपोली, लोणावळा, पुणे, कराड मार्गे मोटारीने जाणार होते. मुंबईतील श्री सिद्धिविनायकाचे दर्शन घेऊन त्यांचा ताफा पुण्याच्या दिशेने निघाला, पण सुमारे तीन तास उशिराने प्रवासाला सुरुवात झाली.

खोपोली शिळफाटा येथे सायंकाळी सात वाजता त्यांचे आगमन होताच, फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. सोमय्या यांनी शिळफाटा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करताच कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज की जय या घोषणांनी आसमंत दणाणून गेला. त्यानंतर त्यांना पुष्पगुच्छ देण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकच गर्दी केली. यात भाजप किसान मोर्चाचे प्रदेश नेते सुनील गोगटे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा अश्विनी पाटील, भाजपचे जिल्हा सरचिटणीस दीपक बेहरे, जिल्हा चिटणीस रमेश मुंडे, नगरसेवक तुकाराम साबळे, खोपोली शहर अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, सरचिटणीस हेमंत नांदे, ईश्वर शिंपी, महिला मोर्चाच्या खोपोली शहर अध्यक्षा शोभा काटे, सरचिटणीस अश्विनी आत्रे, रसिका शेटे, भाजपचे खालापूर तालुका अध्यक्ष रामदास ठोंबरे, युवा मोर्चाचे खोपोली शहर अध्यक्ष अजय इंगुलकर, सरचिटणीस विनायक माडपे, सिद्धेश पाटील, कर्जत तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, अनिता शहा, खोपोलीचे माजी नगराध्यक्ष सोहनराज राठोड, प्रमोद पिंगळे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी खोपोली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



(छाया : विनायक माडपे)

# साकव अर्धवट, तरीही लागली नावांची पाटी

## नेरळ विकास प्राधिकरणच्या कामामध्ये प्रताप

**कर्जत : बातमीदार**

नेरळ-ममदापूर संकुल विकास प्राधिकरणामधून नेरळ ग्रामपंचायत हद्दीत अनेक विकासकामे सुरू आहेत. त्यात नेरळ-कोल्हारे जिल्हा मार्गावर १० लाख रुपयांच्या निधीमधून मंजूर झालेले साकवाचे काम अर्धवट अवस्थेत आहे. तरीही तेथे कामाच्या माहितीची पाटी लावण्यात आली आहे. हा तर काम अर्धवट असताना बिल लाटण्याचा प्रकार असल्याची चर्चा सध्या सुरू आहे.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील मातोश्रीनगरकडे जाणाऱ्या भागात कोल्हारे-नेरळ जिल्हा मार्गावर लहान पूल (साकव) आहे. हा सकाव अरूंद असल्यामुळे वाहनांची कोंडी होत होती. त्यामुळे त्या ठिकाणी आणखी एक पूल असावा, अशी मागणी होत होती. रायगड जिल्हा परिषदेने जिल्हा नियोजन विभागातून त्या रस्त्यावर साकव मंजूर केला होता. नेरळ ममदापूर संकुल विकास प्राधिकरणमधून नऊ लाख ९७ हजार रुपये खर्चाचे अंदाजपत्रक असलेल्या या साकवाचे काम मागील दोन महिन्यांपासून सुरू आहे. साकव बांधून पूर्ण झाला असला तरी त्याच्या एका बाजूला लोखंडी रेलिंग बसविण्यात आलेले नाहीत, तसेच या साकवाच्या स्लॅबवर काँक्रीटचा नवीन थर टाकण्यात आलेला नाही. साकवाच्या दोन्ही बाजूचे रस्ते कोणत्याही प्रकारचे काम न करता, तसेच ठेवण्यात आले आहेत. तेथील पूर्वीचे खड्डे, तसेच ठेवण्यात आले आहेत. ही कामे अर्धवट असताना ठेकेदाराकडून साकवाजवळ कामाची पाटी लावण्यात आली आहे.

वास्तविक काम पूर्ण झाल्यानंतरच ठेकेदार कामाच्या माहितीची ग्रॅनाईट पाटी लावतो. त्यामागे काम पूर्ण झाले असा संकेत असतो. त्यानंतर कामाचे बिल ठेकेदाराला देण्यात येते, मात्र या ठिकाणी साकवाचे काम अर्धवट ठेवून संबंधित ठेकेदारने कामाची माहिती असलेली ग्रॅनाईट पाटी लावली आहे. त्यामुळे अर्धवट कामाचे बिल लाटण्याचा हा प्रकार आहे काय, अशी चर्चा सुरु झाली आहे.




(छाया : संतोष पेरणे)




**नेरळ-कोल्हारे रस्त्यावर सुरू असलेले साकवाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. ठेकेदाराने कामाची माहिती देणारी पाटी लावली आहे, मात्र आम्ही त्या कामाबाबत अंतिम बिल अदा केलेले नाही. सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर त्यांची पाहणी करूनच बिल अदा केले जाईल.**

**-आर. एस. देवांग, तांत्रिक अधिकारी, नेरळ ममदापूर संकुल प्राधिकारी, अलिबाग**

# लाचखोर जिल्हा उपनिबंधक आणि लिपिकाला दोन दिवसांची पोलीस कोठडी

**अलिबाग : प्रतिनिधी**

सोसायटी नोंदणी प्रमाणपत्र पडताळणी प्रकरणी सोमवारी अलिबाग लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने पकडलेल्या सहकार संस्था विभागाचे जिल्हा उपनिबंधक गोपाळ मावळे आणि मुख्य लिपीक सुहास दवटे यांना मंगळवारी (दि. २८) अलिबाग जिल्हा न्यायाधीश आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश थत्ते याच्या न्यायालयात हजर केले. न्यायालयाने दोघांनाही दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

सहकार संस्थेच्या कार्यालयातील जिल्हा उपनिबंधक गोपाळ मावळे आणि मुख्य लिपीक सुहास दवटे यांनी रोहा अष्टमी येथील एका सोसायटी नोंदणी प्रकरणाची पडताळणी करून प्रमाणपत्र देण्यासाठी ४० हजारांची लाच मागितली होती. तक्रारदार यांनी याबाबत अलिबाग लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पथकाने सापळा रचून सोमवारी मावळे आणि दवटे यांना लाच स्वीकारताना अटक केली. मंगळवारी त्या दोघांना अलिबाग जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आले.

सरकार पक्षातर्फे सरकारी वकील ॲड. भूषण साळवी यांनी मावळे याचे नाशिक येथील एका बँकेत लॉकर आहे, तसेच इतर कार्यालयातील प्रकरणात आर्थिक देवाणघेवाण प्रकार झाले आहेत का, असा युक्तिवाद करून दोन दिवसांची पोलीस कोठडी देण्याची विनंती न्यायालयाकडे केली होती. आरोपी पक्षातर्फे ॲड. प्रवीण ठाकूर यांनी युक्तिवाद केला. दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायाधीश थत्ते यांनी मावळे आणि दवटे यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# शेकापची जिल्हा स्तरावरील सर्व चिटणीस मंडळे बरखास्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दोन दिवसीय बैठकीचे आयोजन सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथे करण्यात आले होते. या बैठकीमध्ये एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. तो म्हणजे शेकापची जिल्हा स्तरावरील सर्व चिटणीस मंडळे बरखास्त करण्यात आली असून नवी चिटणीस मंडळे एका महिन्याच्या आत नव्याने स्थापन करण्यात येणार आहेत. दोन दिवसीय मध्यवर्ती समितीच्या बैठकीत एकूण सहा ठराव करण्यात आले आहेत.

राज्यातील वीज ग्राहकांना सवलत द्यावी, विनाअनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांची राज्य शासनाने ५० टक्के इतके आरक्षण जाहीर करावे, राज्यात सुरू असलेल्या महिला अत्याचाराच्या घटनांची सरकारने दखल घ्यावी व त्यावरील कायदे आणि शिक्षा यांची लवकरात लवकर अंमलबजावणी करावी, कोल्हापूर राज्यातील पूरग्रस्त भागात शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, असे एकूण सहा विविध ठराव या वेळी करण्यात आले.

राज्यात महाविकास आघाडीला पाठिंबा असला, तरी सांगोला तालुक्यात मात्र महाविकास आघाडीचा प्रयोग यशस्वी होणार नसल्याचे जयंत पाटील यांनी या वेळी सांगितले.

# माणगाव न्यायालयात राष्ट्रीय लोकन्यायालयास चांगला प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील जिल्हा व सत्र न्यायालयात शनिवारी (दि. २५) राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यात एकूण १०९ प्रकरणे निकाली निघून दोन कोटी १६ लाख ९५ हजार ९९९ एवढ्या रकमेची वसुली झाली व पक्षकारांना नुकसानभरपाईची रक्कम देण्यात आली.

या लोकन्यायालयामध्ये बँकवसुली, वीज बिल, नुकसान भरपाईची प्रकरणे नेमण्यात आली होती. त्यातील एकूण १०९ प्रकरणे निकाली निघाली. माणगाव न्यायालयातील न्यायाधीश व वकील वर्गाने जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढण्याकरिता पूर्वतयारी महिनाभर अगोदरपासून केली होती. जिल्हा न्यायाधीश एन. एस. कोले, प्रिया बनकर, अतिरिक्त सत्र न्यायाधीश टी. एम. जहागीरदार, दिवाणी न्यायाधीश अपर्णा रोकडे, विजयालक्ष्मी कुलकर्णी, माणगाव बार असोसिएशन अध्यक्ष ॲड. महेंद्र मानकर यांच्यासह सर्व पक्षकार, बँक अधिकरी, नगरपालिका अधिकारी यांनी लोकन्यायालय यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

# खालापुरातील मोर्बे धरण भरले


## पाण्याचा विसर्ग सुरू; नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

गेल्या दोन दिवसांपासून सतत पडणाऱ्या पावसामुळे खालापूर तालुक्यातील मोर्बे धरणातील पाण्याची पातळी ८८.०० मीटर झाल्याने मंगळवारी (दि. २८) सायंकाळी ५ वाजता या धरणातून पाणी सोडण्यात आले.

खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी तातडीने गटविकास अधिकारी आणि स्थानिक ग्रामपंचायतींना सांगून नदी किनारी असणाऱ्या गावांना, फार्महाऊस, नागरिकांना सावध राहण्याचा इशारा दिला आहे. मंडळ निरीक्षक किरण पाटील, तलाठी अमोल बोराटे, ग्रामविकास अधिकारी एस. पी. जाधव व ग्रामपंचायत कर्मचारी सदर ठिकाणी लक्ष ठेवून आहेत.





**खोपोली : सलग पडणाऱ्या मुसळधार पावसाने खोपोली रेल्वेस्थानकाजवळील नाल्यातील पाणी उलटून मंगळवारी रेल्वेमार्गावर आले. त्यामुळे फलाट क्रमांक दोनवर लोकल ट्रेन उभी राहिली होती.** (छाया : विनायक माडपे)


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Re-Tender Notice**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work

| Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Re-Ten-5/21-22 (RFX No. 7000020391) | | | Period for submission of E-Bid: 28.09.2021 to 05.10.2021 up to 23:59 hrs. | | |
|---|---|---|---|---|---|
| Name of Work : AMC for refilling, testing and spares for fire extinguishers at 400kV R.S., Kharghar | | | | | |
| **Estimated Cost** | **EMD (Rs.)** | **Tender Fee (Rs.)** | **Closing Date** | **Technical opening date** | **Commercial opening date** |
| Rs. 3,00,000/- (Including GST) | Rs. 5000/- | Rs. 525/- (Including GST) | **05.10.2021** up to 23:59 hrs. | **06.10.2021** at 10:00 hrs. (If possible) | **06.10.2021** at 10:15 hrs. (If possible) |

**Contact Persons :**
1) Mr. V. K. Surpatne, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 9769213878
2) Ms. P. C. Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website **www.mahatransco.in**
1] Tender documents can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date.
MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.
**Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - https://srmetender.mahatransco.in.**

**SD/-**
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Tender No. | Description | Estimated cost |
|---|---|---|
| **Tender -13 / 2021-2022 ... 1st extn.** | Supply 22KV and 33kV Lightening Arrestors required at various substations under EHV (O&M) Circle Panvel, **EMD Rs. 5000/- …….RFX No. 7000020936** | **Rs. 2.23 Lakhs** |
| **Tender -14 / 2021-2022 ... 1st extn.** | Procurement of 36kV Circuit Breakers under EHV O&M circle , Panvel **… EMD Rs. 10,568/- …RFX No. 7000020937** | **Rs. 10.56 Lakhs** |

Tender fee Rs.500/- + GST **Submission of bids from 29.09.2021 to 07.10.2021 up to 11.00 hrs, Bid opening date:- 07.10.2021** if possible.
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm)
Tel. No. 022-27459624 / 25.

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



प्रो. जमा रु. १००/-

अर्जदारांकरिता ॲडव्होकेट
**श्री. प्रशांत परशुराम वाघमारे**
नि. नं. ८/ड
ने. ता. ३०/१०/२०२१

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश व स्तर यांचे कोर्टात.**
**दिवाणी चौकशी अर्ज क्र. १३२०/२०२१**

**१. कुमारी. वृषाली मिलींद शेंडे.**
वय- २३ वर्षे, व्यवसाय- शिक्षण
**२. कुमार. साहिल मिलींद शेंडे.**
वय - २१ वर्षे, व्यवसाय- शिक्षण
दोघे राहाणार :- बी/३-२, अम्रित को. ऑ. हौ. सो., प्लॉट नं. ६, सेक्टर- १४, नविन पनवेल, पनवेल, महाराष्ट्र- ४१०२०६. ... अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की,

१. कै. चेतना मिलींद शिंदे यांचे दिनांक ०७/०४/२०२० रोजी टाटा हॉस्पिटल, परेल, मुंबई येथे मृत्यू झाला आहे. कै.चेतना मिलींद शिंदे यांच्या मृत्यू पश्चात वरीलपैकी अर्जदार क्र. १ व २ हे कै. चेतना मिलिंद शिदें यांचे कायदेशीर वारस आहेत.

२. कै. चेतना मिलिंद शिंदे यांनी त्यांच्या मृत्यूपुर्वी खालील वर्णनित बचत खाते कर्नाळा नागरी सहकारी बॅंक लि. पनवेल, नविन पनवेल शाखा या बॅंकेमध्ये बचत खाते होते व आहे.

| बॅंकेचे नाव | शाखा | अकाउंट नं | कस्टमर नं | रक्कम रू |
|---|---|---|---|---|
| कर्नाळा नागरी सहकारी बॅंक लि. पनवेल | नविन पनवेल | ०२२०१०१०२ ०००३७९ | ८१९४१ | ७,४१,३०९/- |

३. सदर वरील वर्णनित जंगम मिळकतीचे सक्सेशन सर्टीफीकेट मिळणेकरीता वरील अर्जदार क्र. १ व क्र. २ यांनी मे. दिवाणी न्ययालय , पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

४. वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस सक्सेशन सर्टीफीकेट देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे. कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होऊन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे. कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेऊन मे. कोर्टात अर्जदार यांचे नावे सक्सेशन सर्टीफीकेट प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक : २८/०९/२०२१

**सही/-**
कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय व. स्तर

शिक्का

**सही/-**
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, पनवेल.

# हैदराबादने राजस्थानला नमविले

**दुबई : वृत्तसंस्था**

मोसमातील पहिला सामना खेळणारा जेसन रॉय (६०) आणि कर्णधार केन विल्यम्सन (नाबाद ५१) यांनी साकारलेल्या अर्धशतकांच्या जोरावर सनरायजर्स हैदराबादने इंडियन प्रीमियर लीगमध्ये सोमवारी झालेल्या लढतीत राजस्थान रॉयल्सवर सात गडी राखून मात केली.

राजस्थानने दिलेले १६५ धावांचे आव्हान १८.३ षटकांत पूर्ण करीत हैदराबादने मोसमातील केवळ दुसऱ्या विजयाची नोंद केली. ते बाद फेरीच्या शर्यतीतून आधीच बाहेर झाले आहेत, पण राजस्थानला आगेकूच करणे या पराभवामुळे अवघड होऊ शकेल.

हैदराबादचे सलामीवीर रॉय आणि वृद्धिमान साहा (१८) यांनी डावाची आक्रमक सुरुवात केली. या दोघांनी पाच षटकांत ५७ धावांची सलामी दिल्यावर साहाला महिपाल लोमरोरने





बाद केले. यानंतर रॉयला कर्णधार विल्यम्सनची उत्तम साथ लाभली. या दोघांनी अर्धशतकी भागीदारी रचल्यावर रॉय माघारी परतला. युवा प्रियम गर्गला खातेही उघडता आले नाही, मात्र विल्यम्सन आणि डावखुऱ्या अभिषेक वर्मा (नाबाद २१) यांनी उर्वरित धावा करत हैदराबादच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

तत्पूर्वी, राजस्थानने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ५ बाद १६७ अशी धावसंख्या उभारली होती. एव्हिन लुईस (६) लवकर माघारी परतल्यावर कर्णधार संजू सॅमसन (८२) आणि मुंबईकर यशस्वी जैस्वाल (३६) यांनी राजस्थानला सावरले. सॅमसनने सलग दुसरे अर्धशतक झळकावताना ऑरेंज कॅपही आपल्या नावे केली. अखेरच्या षटकात लोमरोरने (नाबाद २९) चांगले योगदान दिले.

**संक्षिप्त धावफलक**

राजस्थान रॉयल्स : २० षटकांत ५ बाद १६४ (संजू सॅमसन ८२, यशस्वी जैस्वाल ३६, सिद्धार्थ कौल २/३६) पराभूत वि. सनरायजर्स हैदराबाद : १८.३ षटकांत ३ बाद १६७ (जेसन रॉय ६०, केन विल्यम्सन नाबाद ५१; महिपाल लोमरोर १/२२).

## कोलकाताचा दिल्लीवर विजय

**शारजा : वृत्तसंस्था**

कोलकाता नाईट रायडर्सने दिल्ली कॅपिटल्सला पराभूत करीत प्ले ऑफमधील आपली आशा पल्लवित ठेवली आहे. शारजाच्या मैदानात दिल्लीने कोलकातासमोर १२८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. हे आव्हान कोलकाता संघाने तीन गडी राखून पार केले. या विजयासह कोलकाता संघाच्या खात्यात दोन गुण जमा झाले असून ते चौथ्या स्थानावर कायम आहे.

धावांचा पाठलाग करताना कोलकाताची सुरुवात खराब झाली. धावफलकावर २८ धावा असताना सलामीवीर व्यंकटेश अय्यर बाद झाला. त्यानंतर मैदानात उतरलेला राहुल त्रिपाठीही अवघ्या ९ धावा करून परतला. शुभमन गिलने ३० धावा करून मैदान सोडले. कर्णधार इयॉन मॉर्गनला खातेही उघडता आले नाही. एका बाजूने विकट पडत असताना नितेश राणाने एक बाजू सांभाळून ठेवली. दिनेश कार्तिक १२, आणि सुनील नरेन १० चेंडूंत २१ धावा करून माघारी परतल्यानंतर साउदीच्या साथीने राणाने संघाला विजय मिळवून दिला.

दरम्यान, या सामन्यात शिखर धवनने पुन्हा एकदा ऑरेंज कॅपवर ताबा मिळवला आहे. अवघ्या २४ तासांत आत त्याने ही कॅप राजस्थान रॉयल्सचा कप्तान संजू सॅमसनकडून हिसकावली.

## आरोग्य प्रहर

### दररोज सकाळी उपाशी पोटी पाणी पिणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर

पाणी पिणे हे आपल्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. रोज सकाळी झोपेतून उठल्यावर उपाशीपोटी पाणी प्यावं. यामुळे शरीरातील सर्व विषारी पदार्थ सहजपणे बाहेर पडतात. त्यामुळे शरीरातील रक्तही शुद्ध होते. अनेकांना बद्धकोष्ठता सारख्या समस्येला सामोरं जावं लागतं. पाणी पिणं हा त्यावरील चांगला उपाय आहे.

सकाळी झोपेतून उठल्यावर उपाशीपोटी तीन ग्लास पाणी प्यावं. काही आठवड्यांनी त्याचा परिणाम तुम्हाला जाणवेल.

जर तुम्ही शरीराचं वजन वाढत असल्याने चिंतेत असाल तर दररोज सकाळी उठल्यावर पाणी प्या. यामुळे तुमच्या मेटाबॉलिज्ममध्ये सुधारणा होईल. त्यामुळे तुमचे वजन कमी होण्यास मदत होईल.

सकाळी लवकर उठून पाणी पिल्याने मासिक पाळी, लघवी, घसा आणि मूत्रपिंडाशी संबंधित आजार दूर होतात. यामुळे दररोज सकाळी उठून दोन-तीन ग्लास पाणी प्यावे.

सकाळी झोपेतून उठल्यावर पाणी प्यायल्यास शरीरात नव्या पेशी तयार होतात, तसेच स्नायूंमध्ये कोणत्याही प्रकारचे दुखणे असेल, तर ते दूर होते. याशिवाय स्नायू आणखी मजबूत होतात.

## संजू सॅमसनचा 'डबल धमाका'



**जयपूर : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सचा कप्तान संजू सॅमसन आयपीएल २०२१मध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू बनला आहे. सॅमसनने सोमवारी सनरायझर्स हैदराबादविरुद्ध ८२ धावांची खेळी करीत ही कामगिरी केली. त्याने यंदाच्या हंगामात आतापर्यंत एक शतक आणि दोन अर्धशतके केली आहेत.

संजूने आयपीएलमध्ये तीन हजार धावा पूर्ण केल्या आहेत. अशी कामगिरी करणारा तो १९वा फलंदाज बनला आहे. ११९ धावा ही त्याची आयपीएलमधील सर्वोत्तम खेळी आहे. संजूने आतापर्यंत आयपीएलच्या इतिहासात तीन शतके आणि १५ अर्धशतके केली आहेत. संजूच्या आता ११७ आयपीएल सामन्यांत ३०१७ धावा झाल्यात. हैदराबादविरुद्धच्या डावात त्याने सात चौकार व तीन षटकार मारले.

सॅमसनने आयपीएल २०१९मध्ये ३४२ धावा आणि २०२० मध्ये ३७५ धावा केल्या. त्याने आता या मोसमात १० सामन्यांत ४३३ धावा केल्या आहेत आणि दिल्ली कॅपिटल्सच्या शिखर धवनकडून ऑरेंज कॅपही घेतली आहे.

## वर्ल्डकप फायनलसाठी बीसीसीआयची तयारी

### २५ हजार चाहते राहणार उपस्थित

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल सामन्यादरम्यान चाहते स्टेडियममध्ये येऊ लागले आहेत. आता भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आणि अमिरात क्रिकेट मंडळ (ईसीबी) २५ हजार चाहत्यांना वर्ल्डकप फायनलसाठी बोलावण्याची तयारी करीत आहे, मात्र यासाठी त्यांना यूएईच्या अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागेल. वर्ल्डकप स्पर्धा ही आधी भारतात होणार होती, पण कोरोनामुळे ती यूएईमध्ये हलवण्यात आली आहे.

पुढील महिन्यापासून यूएई आणि ओमानमध्ये आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धा होणार आहे. १७ ऑक्टोबर ते १४ नोव्हेंबर या कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेत १६ संघ सहभागी होत आहेत. बीसीसीआय स्पर्धेचा आयोजक आहे. वर्ल्डकपचा अंतिम सामना १४ नोव्हेंबर रोजी दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला जाणार आहे. तथापि, सध्या यूएईमध्ये केवळ १० टक्के चाहत्यांना परवानगी आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, बीसीसीआय आणि ईसीबीला फायनलसाठी मोठ्या संख्येने चाहत्यांना आमंत्रित करायचे आहे. जर सर्व प्रोटोकॉल लक्षात ठेवून परवानगी दिली




गेली तर ती चांगली ठरेल, मात्र परवानगीबाबत अद्याप काहीही सांगता येणार नाही. या स्पर्धेच्या पहिल्या फेरीचे सामनेही ओमानमध्ये होणार आहेत.

आयपीएलदरम्यान दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर सामना पाहण्यासाठी चाहत्यांना पीसीआर चाचणी करण्याची गरज नाही. त्यांना फक्त कोरोना लसीकरणाच्या दोन्ही डोसचे पुरावे द्यावे लागतील. दुसरीकडे, शारजाहचे नियम वेगळे आहेत. येथे केवळ १६ वर्षांवरील प्रेक्षकांना प्रवेश मिळेल. याशिवाय लसीकरण प्रमाणपत्र आणि पीसीआर चाचणीचा निकालदेखील सोबत आणावा लागेल. अबुधाबीच्या शेख झायेद स्टेडियमवर १६ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या चाहत्यांना लसीकरणाचा पुरावा द्यावा लागेल. यासह पीसीआर चाचणीचा निकालदेखील सोबत घ्यावा लागेल. जर कोणी एकदा स्टेडियमच्या बाहेर गेला असेल, तर त्याला परत येऊ दिले जाणार नाही.


## प्रथम पुण्यस्मरण



**कै. नारायण नामदेव म्हात्रे**

सुरू आहे वाटचाल तुमच्या आशीर्वादाने, सदैव जपतो आम्ही तुमच्या आदर्श व स्मृतीला, आपल्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली!


**श्री समर्थ कृपा निवास, मु. कोन, पो. आजिवली ता. पनवेल, जि. रायगड**


## जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा

**रसायनी : प्रतिनिधी**

अलिबागमधील खिडकी येथे सामाजिक कार्यकर्ते, माजी मुख्याध्यापक, स्व. व्ही. जी. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धा खुल्या गटात साखळी पद्धतीने खेळविण्यात येणार आहे. स्पर्धकांनी आपली नावनोंदणी ३० सप्टेंबर अगोदर प्रवेश फी ५० रुपये गुगल पेद्वारे भरून दर्शन पाटील (९९२३९५२७३२) किंवा श्रेयस पाटील (९४२०७२८५६४) यांच्याकडे करावी तसेच नाव, ठिकाण, जन्मतारीख, मोबाईल व्हॉट्सअॅप नंबर, व्हॉट्सअॅप किंवा एसएमएसने विलास म्हात्रे, अलिबाग (८८८८०११४११), गोपीनाथ डंगर, अलिबाग (९८५००१५४४०), चंद्रशेखर पाटील, पनवेल (९३२६५०४१७९), संदीप पाटील, उरण (९९२०३५१९८३), किशोर देशपांडे, गोरेगाव (८८८८२५०२३४), अंकित जोशी, कर्जत (८०८७४४०९३६) यांच्याकडे द्यावेत. सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र, यशस्वी स्पर्धकांना रोख रकमेचे बक्षीस, तर पहिल्या पाच स्पर्धकांना चषक देण्यात येणार आहे.



## कुस्तीपटू निवड, मार्गदर्शक नियुक्तीसाठी सूचना जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील कुस्ती मार्गदर्शकाच्या नियुक्तीसाठी ३० सप्टेंबर रोजी दुपारी १ वा. अलिबाग नेहुली संगम येथील जिल्हा क्रीडा संकुलात निवड चाचणी होणार आहे तसेच कुस्ती खेळाडूंच्या निवड चाचणीकरिता २९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वा. खोपोलीतील कै.भाऊसाहेब कुस्ती संकुलात कुस्ती खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्राकरिता निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे.

कुस्ती खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्राकरिता निवड चाचणीसाठी वयोमर्यादा ८ ते १२ वर्षे (मुले, मुली) असून खेळाडूंनी चाचणीला येताना संपूर्ण कुस्ती किट सोबत आणणे आवश्यक आहे. प्रशिक्षक नियुक्ती निवड चाचणीकरिता वयोमर्यादा १८ ते ४५ वर्षे असून यामध्ये अति उच्च कामगिरी, गुणवत्ता असल्यासच समितीच्या मान्यतेने ५० वर्षपर्यंत उमेदवारांना संधी देण्यात येईल.

दिलेल्या मुदतीत कोणतीही वाढ केली जाणार नाही. याबाबत सर्व मुख्याध्यापक, प्राचार्य, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये, शिक्षक, विद्यार्थी, पालक यांनी शासनाने दिलेल्या कोविड-१९च्या नियमांचे पालन करण्याबाबतही नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी क्रीडा मार्गदर्शक संदीप वांजळे (९८५०९५४२३७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर यांनी केले आहे.














दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com